

प्राचार्य भणगे
कुलगुरु टोपे
डॉ. प्र. चिं. शेजवलकर

Y.C.P LIBRARY
M923.60954/MAY
019238

# यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

M923.60954
MAY
019238

का नगरवाचनालय, कऱ्हाड.

Y. B. CHAVAN LIBRARY
- MUMBAI -
CALL NO.
ACC. NO.: 19238
DATE: 20.05.09

YCP-LIB
M923.60954 MAY 019238

# यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

## वर्ष तिसरे १९७५.

किमत चार रुपये

प्रकाशन :
**श्री. गोपाळराव मयेकर,**
माजी शिक्षणमंत्री, गोवा, दीव व दमण
व प्राचार्य
देवगड कॉलेज, देवगड
यांच्या शुभहस्ते
१२ मार्च १९७६

प्रकाशक :
**श्री. पी. डी. पाटील**
अध्यक्ष,
कराड नगरपालिका, कराड

मुद्रक :
**श्रीसाईनाथ प्रिंटिंग प्रेस,**
१८७, गुरुवार पेठ,
कराड.

---

**मुखपृष्ठ छपाई व रचना** : व्हिज्युअल डिझाईन रिसर्च युनीट, कोल्हापूर.



नामदार यशवंतराव चव्हाण

# मनोगत

'यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला' ही १९७३ साली सुरू झाली. त्या निमित्ताने गतवर्षी ज्या थोर विचारवंतांची तीन व्याख्याने झाली; त्याची ही मुद्रित प्रत वाचकांच्या हाती देतांना मनाला एक समाधान जाणवते.

साहित्य, सौंदर्य, संगीत, क्रीडा, करमणूक या समाजजीवनाला समाधान देणाऱ्या गोष्टी आहेत. शारदीय व्याख्यानमालेच्या निमित्ताने कराड नगरपालिकेने या संदर्भात कराडची एक वैशिष्ट्यपूर्ण अभिरुची निर्माण केली आहे. त्याचबरोबर आजच्या गतिमान कालखंडात, नव्या पिढीतील समाजघटकात चिकित्सक नि अभ्यासू वृत्ती वाढीस लागावी, सामाजिक, राजकीय, आर्थिक समस्यांचा आणि स्थित्यंतराचा परिचय व्हावा ही निकडीची गरज आहे. समाजातील विचारवंतांचे विचारधन मुक्तपणे उपलब्ध करून देण्याच्या हेतूने ही व्याख्यानमाला आयोजित करण्यात येत असते. एका प्रयत्नवादी,

अभ्यासू नि यशस्वी अशा सर्वस्पर्शी व्यक्मित्त्वाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने हे जन जागरणाचे; संस्काराचे काय आरंभिले आहे.

यशवंतरावजी चव्हाण कराडचे सुपुत्र आहेत, अखिल भारतीय नेतृत्त्व त्यांच्या परिश्रमांना लाभलेले फळ आहे. त्यांचा वाढदिवस हा प्रत्येक कराडकराच्या जीवनातील एक महत्त्वाच्या भावनेने हेलावणारा दिवस आहे.

यशवंतरावजी चव्हाण यांच्या स्वरूपात दिसणारे हे नेत्रदीपक प्रज्ञाप्रचीतीचे राजकीय आणि सामाजिक व्यक्तिमत्त्व कलेकलेने साकारत गेले; त्याचा विचार नि उच्चार समाज परिवर्तनाला उपकारक ठरेल या भावनेने त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने ही व्याख्यानमाला आयोजित करण्यात निश्चित औचित्य आहे! सामाजिक, राजकीय, आर्थिक समस्यांचा परिचय होत राहिला; विचारविवेकविमर्ष या विचारमंथनाच्या प्रक्रिया व्यक्तीच्या जीवनावर जर संस्कार करून गेल्या तर कोणता सामाजिक अविष्कार दिसू शकतो त्याचे यशवंतरावजी चव्हाण हे मूर्तीमंत उदाहरण आहे !

जन्मतः पारंपरिक, सामाजिक किंवा आर्थिक सुबकतेचे वा प्रतिष्ठेचे आवरण यशवंतरावजींना लाभले नाही. प्रतिकूलतेची पाठशिवणी सतत चालू असताना, आत्मविश्वासाने, अभ्यासूवृत्तीने त्यांनी आपले ' ज्ञान दालन ' प्रयत्नपूर्वक समृद्ध केले. ध्येयपूर्तीसाठी ठामपणे उभे राहून, अविचल मनोनिग्रहाने त्यांनी प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाची साक्ष पटवली आहे. आकांक्षेकडे झेप घेणारी निष्ठा, वाणी, करणी यांच्या विद्यार्थीदशतील साधना आहे ! म्हणूनच नव्या पिढीने त्यांच्या व्यासंगाचा नि प्रयत्नवादाचा अभ्यास केला पाहिजे असे वाटत राहाते.

भारतीय सामाजिक नि राजकीय क्षेत्रात ते "एक विचार" म्हणून गौरवले जातात. पण ही त्यांना लाभलेली ईश्वरदत्त गोष्ट नाही, त्यांचा हा होणारा गौरव त्यांनी सतत व्यासंगाने, चिकित्सक वृत्तीने नि अभ्यासाने आत्मसात केलेली "साधना" आहे. भावी काळाचा अचूक वेध घेणारी त्यांची प्रज्ञा, त्यांच्या एकाग्र चिंतनाची परिणती आहे. बालवयातही सवंग लोकप्रियतेचा मोह त्यांना झाला नाही. सत्यशोधक सामाजिक चळवळीच्यापेक्षा काँग्रेसच्या व्यापक ध्येयधोरणाचा परिचय करुन घेण्यात त्यांनी स्वतःला गुंतवून घेतले होते. भावनेपेक्षा विचाराला शरण जाणे ही त्यांची वृत्ती त्यांच्या राजकारण पटुत्वाची यशोध्वजा ठरली !

राजकारण असो, समाजकारण असो, अर्थकारण असो कोणत्याही गंभीर समस्याचे विचार एकाग्रतेने करावा. आपल्या सहकारी मित्राबरोबर साधक बाधक चर्चा करावी आणि भावनावश न होता जो निर्णय तर्कशुद्ध, वस्तुनिष्ठ आहे तो शिरोधार्य मानून कोणत्याही परिणामाची मुलाहिजा न ठेवता त्याचा पाठपुरावा करावा हा यशवंतराव चव्हाणांचा स्वभावविशेष आहे !

क्वचित स्वतःच्या मनाला किंवा सहकाऱ्याच्या मनाला क्लेशकारक निर्णयही एकदा तर्कशुद्ध, वस्तुनिष्ठ नि अंतिम श्रेयस्कर आहे अशी खात्री झाली की तो प्रथम उच्चारण्याचे मनोधैर्य यशवंतरावच दाखवू शकतात ! या विज्ञान युगातील गणकयंत्रातून बाहेर पडणारे बिनचूक उत्तराइतके अचूक निर्णायक उत्तर स्वीकारण्याची त्यांची मानसिक तयारी त्यांच्या प्रज्ञेचा चमत्कार वाटतो. राजकारणातील अत्यंत नाजूक नि अत्यंत कठीण प्रसंगी अनेकवेळा त्याचा पडताळा आला आहे.

परिस्थितीचे आव्हान स्विकारण्याची त्यांची तयारी स्वतःच्या

व्यासंगावरील नि अभ्यासू धारणेवरील जबरदस्त विश्वासच ! मुंबई राज्याचा, महाराष्ट्र राज्याचा नि भारताच्या राजकारणातील त्यांच्या धाडशी भूमिकांची ओळख सर्वांनाच जवळून झालेली आहे. राजकीय वा सामाजिक चळवळीची परिस्थिती कोठे थांबेल याचे अचूक निदान यशवंतरावजी करू शकतात; अशावेळी त्यांची शोधकदृष्टी आपल्या निदानाचे समर्थन करताना बोधक ठरते. पंडितांच्या सभेत तर्कशुद्ध नि समर्पक दाखवल्यांनी बिनतोड युक्तिवाद करणारी त्यांची भाषाशैली; राजकीय किंवा सामाजिक लेणे घेऊन जनसामान्यांच्या मनाचा कब्जा करते !

काँग्रेसचा एक सैनिक म्हणवून घेण्यात यशवंतराव स्वतःला धन्य समजत आलेले आहेत. पण ते सैनिक आहेत त्याहीपेक्षा ते कुशल संघटक आहेत. सतत कार्यकर्त्यांचा संच उभा करून त्यांना ध्येयनिष्ठेने आणि कार्य प्रेरणेने गतिमान करण्यात त्यांना लाभणारे यश इतरांनी हेवा करावा असे आहे !

यशवंतराव चव्हाण यांचा जीवनलेख चढता वाढता आहे; पण तो त्यांनी अनुभवलेल्या सामाजिक, राजकीय क्रिया-प्रतिक्रियांचा परिपाक आहे.

या व्याख्यान मालेतील व्याख्यानातून यशवंतरावांच्या जीवनचरित्राची चर्चा होत रहावी हा प्रधान हेतू नाही. तर आजच्या भारतीय समाजाच्या नि राष्ट्रीय जीवनाच्या समस्या आव्हानाचे स्वरूप घेऊन आपल्यापुढे उभ्या ठाकल्या आहेत त्या सामाजिक, राजकीय, आर्थिक समस्यांचा अभ्यासपूर्ण ऊहापोह अधिकारी व्यक्तींच्या आयोजित व्याख्यानातून व्हावा, हाच प्रधान हेतू या व्याख्यानमालेचा आहे.

समस्यांना आत्मविश्वासाने सामोरे जाण्याचे धैर्य नव्या पिढीने

यशवंतरावांच्या सहृदयतेने व अभ्यासू वृत्तीने दाखवावे. यशवंतरावांच्या एकाग्रतेने प्रत्येक समस्येचे मनन, चिंतन करावे, यशवंतरावांच्या तर्कशुद्ध विचारपद्धतीने स्वतःचे निष्कर्ष काढावेत आणि यशवंतरावांच्या ध्येयनिष्ठेने व जिद्दीने ते निष्कर्ष व्यवहारात आणावेत ! यशवंतरावांच्या भक्तिभावाने समाजाची नि मातृभूमीची सेवा करावी हीच उत्कट भावना या मागे अनुस्यूत आहे ! !

यशवंतरावांचे जीवन चरित्र हे नव्या पिढीला दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरणारे आहे. म्हणूनच नामदार यशवंतराव चव्हाण यांचे जीवन हा अभ्यासाचा विषय आहे. महाराष्ट्रातील सामाजिक नि राजकीय चळवळीचे प्रवाह समजून देणारा एक जीवनस्त्रोत खळाळून पुढे धावतो आहे अशा गतिमान व्यक्तिमत्त्वाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने जनजागरणाचा उपक्रम सुरू करावा; त्यांच्या अभिष्टचिंतनाबरोबरच विचारचिंतनाला सुरुवात करावी म्हणून हा सुयोग साधला आहे !

आमच्या निमंत्रणाला मान देऊन प्राचार्य भा. शं. भणगे, मुंबई, कुलगुरु त्र्यं. कृ. टोपे, मुंबई आणि डॉ. प्र. चिं. शेजवलकर, पुणे या थोर विचारवतांनी एक एक विचाराचे कोरीव लेणे मराठी मनावर कायमचे कोरून ठेवले आहे. त्या सर्वांचे कृतज्ञ आभार मानणे आमचे कर्तव्य आहे.

थोर शब्दांचे हे 'अक्षर' स्वरूप प्रकट होताना प्रा. वि. पु. गोखले, श्याम घळसासी यांनी परिश्रम घेतले आहेत. कराडमधील या साहित्यसेवकांचा अशा कामावरील लोभ उपक्रमांना रेखीव रुप देणारा ठरतो. म्हणून त्यांचे सप्रेम आभार मानतांना आपलेपणाचा आनंदही साठलेला असतो.

व्हिज्युअल डिझाईन रिसर्च युनिट, कोल्हापूरचे डिझाईन आर्टिस्ट भूपाल मांगोरे यांनी सदर पुस्तिकेचे अंतरंग व बाह्यरंग आकर्षित व मनोवेधक करणेसाठी जे परिश्रम घेतले तसेच श्रीसाईनाथ प्रिंटींग प्रेसचे व्यवस्थापक नि कामगार यांनी ही पुस्तिका वेळेवर व सुबक छापून दिली त्याबद्दल उभयतांचे आम्ही आभारी आहोत.

या व्याख्यानमालेत जे जे विचारमंथन, चिंतन होईल ते ते त्याच विचारवंतांच्या भाषेत ‘अक्षर’ करण्याच्या हेतूने प्रतिवर्षी व्याख्यानांची पुस्तिका प्रसिद्ध केली जावी हाही हेतू आहे. गेल्या वर्षीच्या व्याख्यानाची ही तिसरी पुस्तिका समाज पुरुषाच्या हाती देतांना एकच प्रार्थना –

ना. यशवंतरावजींना राष्ट्रसेवेसाठी उदंड आयुरारोग्य लाभो ! त्यांच्या जीवनाचा आदर्श नव्या पिढीला जीवनाची विधायक दृष्टी देणारा ठरो !

कराड
मार्च १९७६

P. D. Jadav

नगराध्यक्ष.

# अंतरंग . . .

१२-३-१९७५

**'आजची आर्थिक परिस्थिती व त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग'**

श्री. भा. शं. भणगे

प्राचार्य,
चिनाई कॉलेज ऑफ् कॉमर्स अँड अिकॉनॉमिक्स,
मुंबई.

---

१३-३-१९७५

**'समाज सुधारणेच्या समस्या'**

श्री. त्र्यं. कृ. टोपे

कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

---

१४-३-१९७५

**'सद्यःस्थिती'**

डॉ. प्र. चिं. शेजवलकर

संचालक,
इन्स्टिटयूट ऑफ् मॅनेजमेंट डेव्हलपमेंट अँड रिसर्च, पुणे.

अडिं. भगत

# " आजची आर्थिक परिस्थिती व त्यांतून बाहेर पडण्याचा मार्ग "

श्री. भालचंद्र शंकर भणगे, एम्. ए. (जन्म १९२२)

सध्या प्राचार्य, चिनाई कॉलेज ऑफ् कॉमर्स अँड इकानॉमिक्स मुंबई.

' समाज प्रबोधन पत्रिका ' द्वैमासिकाचे संपादक.

अर्थशास्त्राचे नामवंत प्राध्यापक म्हणून परिचित.

कोल्हापूर येथील कॉमर्स कॉलेजचे आणि नेस वाडिया वाणिज्य महाविद्यालय (पुणे) चे माजी प्राचार्य.

राष्ट्र सेवादलाचे जुने कार्यकर्ते.

शिवाजी विद्यापीठाच्या कॉमर्स फॅकल्टीचे माजी डीन.

आधुनिक अर्थशास्त्र ' भा. १ व २ आणि ' रुपयाचे अवमूल्यन ' ही दोन पुस्तके फारच गाजलेली आहेत. इतर पुस्तके ही त्यांनी लिहिली आहेत.

" साहित्य विचार आणि समाजचिंतन " हा ग्रंथ गं. बा. सरदार यांच्या सत्कारासाठी त्यानी तयार केला आणि त्याचे प्रकाशन माननीय यशवंतराव चव्हाण यांचे हस्ते झाले. ' अिकॉनॉमी ऑफ् महाराष्ट्र ' या ग्रंथाच्या संपादका पैकी प्राचार्य भणगे हे एक होत.

“ देशातली आजची परिस्थिती भयावह आहे. सरकारची मृदुता, त्या बरोबर उद्‌भवणारा भ्रष्टाचार, किंमतीची वाढ आणि विषमता ही त्यास कारणीभूत आहेत. सरकारची विश्वासार्हता कमी होत आहे ही तितकीच भयावह घटना आहे. सरकारने कणखर बनले पाहिजे आणि वरील दोषांवर इलाज योजले पाहिजेत. अशा सरकारला लोकांनीही शिस्त पाळून सहकार्य दिले पाहिजे ”

ज्येष्ठ मित्रांनो,

सुरुवातीलाच मी आपले आभार मानतो. आपण मला वारंवार व्याख्यानांसाठी येथे बोलावले आणि एका अर्थाने अतिपरिचयही झाला असेल. पण अतिपरिचयामुळे जी अवज्ञा होते असा नियम आहे तो नियम आपण मोडला. मला तुम्ही आज ह्या पुस्तिकेच्या प्रकाशनासाठी आणि व्याख्यानमालेच्या उद्‌घाटनासाठी बोलावले आहे. सुरुवातीलाच मी जाहीर करतो की गेल्या वर्षीच्या व्याख्यानाची ही पुस्तिका आता इथे प्रकाशित झाली आहे. या पुस्तिकेमध्ये गेल्या वर्षीची तीन व्याख्याने ही लेखरूपाने आलेली आहेत. पहिले व्याख्यान प्राचार्य ए. एम्. खान यांचे, दुसरे वि. अ. नाईक यांचे आहे आणि तिसरे सदाशिवराव बागाईतकर यांचे आहे. या तिन्ही लोकांनी मिळून लोकशाही आणि अविकसित देशातील समाजवाद असा विषय घेतला होता. हे तिघे व्याख्याते महाराष्ट्रात महशूर आहेत. ते विचारवंत म्हणून गणले जातात. ही पुस्तिका प्रसिद्ध केल्याबद्दल नगरपालिकेचे मी अभिनंदन करतो. तुम्ही मला बोलायला सांगितले आहे आणि व्याख्यानमालेत मी बोलतो आहे. या व्याख्यानमालेमध्ये बोलायला मला आनंद वाटतो. तुम्ही यशवंतराव चव्हाणांच्या गौरवासाठी आणि त्यांच्या वाढदिवसासाठी ही व्याख्यानमाला योजली आहे. मी स्वतः यशवंतरावांना खूप वर्षे विचारवंत म्हणून ओळखत आहे. तुमच्यापैकी काहींनी यशवंतरावांना जवळून पाहिले– १९४२ च्या चळवळीत. नंतर राज्यकर्ते म्हणून पाहिले. स्नेही म्हणून तुमचा परिचय आहे अनेकांचा. माझा वैयक्तिक परिचय थोडाफार आहे. यशवंतराव हे महाराष्ट्रातले विचारवंत आहेत असे मी नेहमीच मानीत आलो आहे. ते महाराष्ट्रात असताना

त्यांची व्याख्याने ऐकण्याचा योग येई. एक त्यांचे व्याख्यान मला आठवते. पुण्यामध्ये शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुवर्णमहोत्सवा-निमित्त त्यांनी ते व्याख्यान दिले होते. प्रचंड मोठा शामियाना होता. हजारो लोक जमले होते. पुण्यातील पंडित महापंडित जमले होते. २।३ पिढयांची मंडळी जमली होती. आणि यशवंतरावांनी व्याख्यान दिले. त्या व्याख्यानामध्ये काही विचार इतके मौलिक आणि इतक्या नेटक्या भाषेमध्ये मांडले की तासदीडतास ते व्याख्यान झाल्यानंतर टाळयांचा कडकडाट झाला आणि मला वाटते की कराडच्या या माणसाने नुसते पुणेच जिंकले असे नव्हे तर सबंध महाराष्ट्र त्यांनी मांडलेल्या विचारांनी जिंकला होता. अध्यक्षपदी होते न्यायमूर्ती गजेंद्रगडकर. हे व्याख्यान आटोपल्या-नंतर गजेंद्रगडकर म्हणाले, इतका प्रभावी विचारवंत फार क्वचित. त्यातील काही विचार मी वारंवार माझ्या व्याख्याना-मधून यशवंतरावांचे म्हणून मुद्दाम आवर्जून सांगितले आहेत. २।३ वर्षापूर्वीचा असा प्रसंग. आम्ही समाज प्रबोधन संस्थेने–ज्या संस्थेचा मी कार्यकर्ता आहे – इंग्रजीमध्ये महाराष्ट्रावरील ग्रंथ प्रकाशित केला : इकॉनॉमी ऑफ महाराष्ट्र. त्याचे चार संपादक. त्यांतील मी एक होतो. आणि आमचे प्रमुख डॉ. वि. म. दांडेकर होते. (त्या प्रकाशनाचा वृत्तांत काही दैनिकांमधून विशेषत: 'महाराष्ट्र टाईम्स' मध्ये रकानेच्या रकाने भरून आला). पुस्तक प्रकाशनाच्यावेळी वि. म. दांडेकरांनी काही विचार मांडले. महाराष्ट्र राज्याबद्दल. काही उल्लेख यशवंतरावांबद्दल आले. आणि सभेचा सबंध नूर बदलला. मी व्यासपीठावर होतो. माझी जबाबदारी दुहेरी होती. मी एक संपादक होतो, आणि त्या प्रकाशन समारंभाचा योजकही होतो. योजक म्हणून शेवटी मला चार शब्द आभाराचे असे बोलायचे होते. आभार मानताना मी आवर्जून उल्लेख केला की यशवंतराव हे नुसते सत्तेवर असणारे मंत्री एवढेच त्यांचे महत्त्व नाही आहे. त्यापेक्षा त्यांचे अधिक महत्त्व

आहे. हा माणूस इतर विचारवंतांच्या पलिकडे पुष्कळदा असतो. आणि त्या दृष्टीने त्यांनी दांडेकरांची टीका मानावी असे आग्रहाने त्यांना मी सांगितले. दांडेकर हे स्वतः विचारवंत. आणि एक विचारवंत दुसऱ्या विचारवंतावर टीका करतो आहे. एक पंडित राज्यकर्त्यावर टीका करतो आहे असे समजू नये. राज्यकर्ता आणि पंडित यांचा हा वाद नाही. सत्ता आणि पांडित्य यांचा विग्रह नाही. एक विचारवंत आणि दुसरा विचारवंत यांच्यामधला विचारवंतांचा हा विग्रह आहे. असे मी त्या ठिकाणी सांगितले होते आणि आज पुन्हा इथं हे सांगतो. याचे कारण असे की आपल्यापैकी अनेक लोकांनी यशवंतरावांना जे अनेक वर्षं जाणले आहे ते महाराष्ट्रातला एक विचारवंत म्हणून. सुदैवाने हा विचारवंत सत्तेवरही आहे. आयुष्यात असे काही योग असतात, त्यातील हा एक सुयोग आहे.

असाच आणखी एक प्रसंग. गं. बा. सरदार हे एक नाणावलेले महाराष्ट्रातील विचारवंत. त्यांच्या षष्ठ्यब्धीपूर्तीसाठी आम्ही एक ग्रंथ तयार केला. त्या ग्रंथाचा संपादक मी होतो. आणि हा ग्रंथ यशवंतरावांच्या हस्ते आम्ही प्रकाशित केला. मला पुण्यातील माझ्या स्नेह्यांनी विचारले, कारे सरदारांसारख्या पंडिताच्या गौरवासाठी ग्रंथ आणि त्या गौरवग्रंथाचे यशवंतरावांच्या हस्ते का प्रकाशन व्हावे ? माझे त्यावेळीही उत्तर होते की यशवंतराव हे मंत्री आहेत, सत्तेवर आहेत ही गोष्ट वेगळी, यशवंतराव विचारवंत आहेत ही गोष्ट महत्त्वाची आहे आणि म्हणून आम्ही यशवंतरावांना बोलावले. ह्या विचारवंतांच्या गौरवासाठी आपण ही व्याख्यानमाला योजिली त्याचा मला आनंद वाटतो.

जो विषय मी बोलण्यासाठी योजला आहे तो असा : 'आजची आर्थिक परिस्थिती व त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग.' विषय महत्त्वाचा आहे. गेली अनेक वर्षे स्थित्यंतर घडत आहे. ह्या

स्थित्यंतराला आपण एक अरिष्ट म्हणून समजलो व हे अरिष्ट ओळखल्यानंतर त्यातून मार्ग काय हा साहजिकच प्रश्न उद्‌भवतो एक काळ असा होता की अशी उमेद वाटे की आर्थिक विकास हा सतत होत राहील–मोठ्या वेगाने होत राहील आणि लोकशाहीला बळकटी येईल. लोकशाही आर्थिक विकासाला प्रेरणा देईल आणि आर्थिक विकास हा लोकशाहीला पूरक होईल. जगापुढे हे पहिले उदाहरण यायचे होते. ज्या उदाहरणामध्ये आर्थिक विकास आणि लोकशाही ही एकमेकाला सहाय्य करीत दोन्ही पुढे जायची होती. त्यामुळे जगभर भारताच्या या प्रयोगाचे कौतुक व्हायचे. विशेषत: लोकशाही देशांमध्ये कौतुक व्हायचे. त्यानंतर आता ही २०।२५ वर्षे गेली आणि हे कौतुक संपलेले आहे. जगामध्ये भारताच्या लोकशाहीचे हसे होत आहे लोकशाही दुर्बल होऊ लागली आहे असे लोक म्हणू लागले. ही दुर्बलता आपल्या इथे प्रत्ययाला येत आहे. आणि विकास हा गेली ४।५ वर्षे झालाच नाही. गेली चार वर्षे झालाच नाही. गेल्या चार वर्षांमध्ये इथे दर डोई उत्पन्न कमी कमी होत आहे हे कसे ? आता असा एक प्रभावी विचार फैलावू लागला आहे की भारतात जर विकास व्हायचा असेल तर लोक-शाहीला छेद द्यावा लागेल. काही काळ तरी लोकशाही स्थगित करावी लागेल. गेल्या आठ दिवसांमध्ये टाईम्स ऑफ इंडियामध्ये माझे एक स्नेही ह. कृ. परांजपे यांनी दोन लेख लिहिले. त्यात एक मुद्दा असा होता की काही काळ–चार वर्षे असा काळ दिला आहे. या लोकशाहीला कदाचित अध्यक्षीय स्वरूप द्यावं लागेल–प्रेसिडेन्शियल डेमॉक्रसी इथं आणावी लागेल.

दर डोई उत्पन्न जिथे वाढायचे तिथे कमी होत आहे. हे घडते तरी कसे ? मला याची तीन कारण स्पष्टपणे दिसत आहेत. तीन दोष आहेत. आणि ही कारणे आणि हे दोष या देशातले नव्याने उद्‌भवलेले नाहीत, गेली २० वर्षे ही कारणे आणि हे दोष या देशाच्या अंगामध्ये–जसा मलेरिया भिनावा, जसा क्षयरोग ठाण

मांडून बसावा – भिनलेले आहेत. जवळ जवळ १०।१२ वर्षांपूर्वी या तुमच्या कराडमध्ये मी एक व्याख्यान दिलं होतं. विषय होता भाववाढ. म्हणजे भाववाढ ही इतकी जुनी गोष्ट आहे. ते तीन दोष असे : १) या शासनाचे स्वरूप २) इथली महागाई ३) इथली विषमता. तिन्ही रोग जुने आहेत.

लोकशाही शासन हे मवाळ असले पाहिजे असे मुळीच नाही. मात्र सगळ्या आशियाई देशामध्ये लोकशाही शासन हे मवाळ, दडपणाखाली लवणारे, अकार्यक्षम असे झाले आहे. गुणार मिरदाल नावाचा एक आंतरराष्ट्रीय कीर्तीचा स्वीडिश अर्थशास्त्रज्ञ आहे. त्याने ५।६ वर्षांपूर्वी ३ ग्रंथांमध्ये असा दावा मांडला की आशियातील सगळी लोकशाही राष्ट्रे 'सॉफ्ट स्टेटस्' आहेत. भारतामध्ये ही गोष्ट प्रकर्षाने दिसत आहे. आणि ह्या दोषाचे एक कारण मी असे मानतो की आपल्याला वाटेल की लोकशाही याचा अर्थ "जो जे वांछील तो ते लाहो" अशी पद्धती. त्यात पक्का विचार, पक्का निर्णय आणि कणखरपणा नाहीत. त्यामुळे आपण समाजाची आर्थिक साधने वाया घालवतो.

नुसती साधने आपण वाया घालवतो असे नव्हे तर लोकांचा विश्वासही आपण वाया घालवतो. सरकारचे मोठमोठे कार्यक्रम होतात. त्या कार्यक्रमाची सरकारने जाणीवपूर्वक चिकित्सा केली होती का ? अग्रक्रम ठरवून त्याप्रमाणे अमका कार्यक्रम हाती घ्यायचा, नंतर दुसरा कार्यक्रम घ्यायचा या पद्धतीने तुलनात्मक काही मिर्णय घेतले होते का ? असे निर्णय घेतल्यानंतर खंबीरपणे त्यांचा पाठपुरावा केला होता का ? कधी नियंत्रण कधी निर्नियंत्रण ; कधी लहान घटकांना मदत ; कधी मोठ्या घटकांना मदत ; कधी या प्रकारचे शिक्षण ; कधी त्या प्रकारचे शिक्षण. आपण प्रयोग करीत गेलो. आणि एवढेच नव्हे तर दर वेळेला दडपणाखाली वागत गेलो. त्याचा परिणाम असा की कुठलाही कार्यक्रम सिद्धीस

गेला नाही. 'नियोजन' असा जरी कार्यक्रम घेतला तरी नेहरूंच्या मृत्यूनंतर (नेहरूंचा मृत्यू मे ६४ मध्ये) नियोजनाबद्दल धरसोड आपण केली आहे. कधी हा नियोजन मंत्री येतो, कधी तो नियोजन मंत्री येतो. ही धरसोड सार्वत्रिक आहे. 'सॉफ्ट स्टेट' चा जो कारभार आहे त्याचा नुसता हा भाग आहे. कुठलाही लहान कार्यक्रम घ्या. तो कार्यक्रम तरी सरकारने राबवला का ? भूमिवितरणाचा कार्यक्रम घ्या. अमुक अमुक इतक्या एकरावर सिलिंग लागेल. ते सिलिंग तरी राबवले का ? ते सेलिंग राबबताना इतके दोष दिसले ते दोष काढण्याचा प्रयत्न झाला का ? चार भावांमध्ये जमीन वाटली, ते चार भाऊ होते. की त्यातील चौथे नाव एका बैलाचे होते ? कुळकायदा आल्यावर मालकाने कुळाशी संगनमत करून कुळाला मालक दाखवला आणि मालक कूळ बनला, हे काय सरकारला माहीत नाही ?

कुठलेही सॉफ्ट स्टेट हे नुसतं साफ्ट रहात नाही. तिथे भ्रष्टाचार येतो. माणसे भ्रष्टाचार करतात ती तशी प्रतिज्ञा करून भ्रष्टाचार करीत नाहीत. नेहमीच्या व्यवहारावरून त्यांच्या लक्षात येते की भ्रष्टाचाराने कामे होतात. लक्षात आले म्हणजे माणसे भ्रष्ट व्हायला लागतात. भ्रष्टाचार एकदा वाढायला लागला म्हणजे शासन हे दुःशासन होते. दुःशासन हा शब्द मी बुद्धिपुरःसर योजतो आहे. शासनाला नीतिमत्तेची चाड रहात नाही. मंत्र्यावर लोकांनी आरोप करावे, अधिकाऱ्यावर आरोप करावे, निरलस अधिकाऱ्यावर आरोप करावे आणि तिथल्या अधिकाऱ्यांनी आणि मंत्र्यांनी ते आरोप अंगावर घ्यावे–याला काय म्हणावे ? इंग्लंड-मधील अलिकडील उदाहरण सांगतो. तिथं जे मजूर मंत्रिमंडळ आहे त्याच्या आधी सुद्धा मजूर मंत्रिमंडळ होते. आताच्या मंत्रिमंडळामध्ये कॅलेहान नांवाचा एक मंत्री आहे. तो मागच्या मंत्रिमंडळातही होता. त्यांनी एकदम राजिनामा देऊन टाकला होता. कारण एवढेच होते त्याची पत्नी ही कलावती आहे.

कलावती म्हणून एका नाट्यगृहाशी तिचा संबंध होता. आणि त्या नाट्यगृहाच्या मालकाने एक पैशाचा व्यवहार केला होता, आणि तो व्यवहार स्वच्छ नव्हता. ही टीका आली आणि या टीकेबद्दल कॅलेहान ह्याने राजिनामा दिला. किती दूरान्वयाने ? त्याची पत्नी – ती कलावती – तिच्या थिएटरचा मालक – तो काही पैशांचा व्यवहार करतो – आणि त्या व्यवहाराबाबत शिक्षा घेतली कॅलहान ह्या मंत्र्याने. आमच्याकडे मोठमोठे आरोप होऊन सुद्धा कधीही त्याची फारशी दखल घेतली जात नाही. मग असे होते की लोकांचा विश्वासच उडतो. सरकार जे जे सांगेल, सरकार जे जे करेल त्याबद्दल लोकांना विश्वास वाटत नाही. आणि ही अवस्था देशाच्या इतिहासामध्ये अत्यंत भयावह असते. एखादा थापाड्या शिक्षक असतो, त्या थापाड्या शिक्षकावर विद्यार्थ्यांचा विश्वास नसतो आणि मग तो शिक्षक सांगतो की बाळांनो, पृथ्वी गोल आहे. ते मुलांना पटत नाही. त्या शिक्षकावर विश्वास नसल्यामुळे जसा मुलांचा विश्वास बसत नाही त्याचप्रमाणे उत्तम कार्यक्रम सुद्धा, तो उत्तम आहे हे सरकारने सांगितले तर हा, सरकारी कार्यक्रम असल्यामुळेच लोकांच्या विश्वासास पात्र ठरत नाही. ही आजची अवस्था आहे; इंग्रजीमध्ये एक शब्द वापरला जातो ' क्रेडिबिलिटी गॅप '. या देशामध्ये लोक आणि सरकार यांच्यामध्ये विश्वासाच्या बाबतीत नुसती लहानशी फट राहिलेली नाही, मोठा खंदक तयार झालेला आहे. सरकारने कुठलाही कार्यक्रम हाती घ्यावा आणि तो कार्यक्रम चांगला आहे असे लोकांना आज वाटण्याची शक्यता कमी राहिली ही गोष्ट मला आज सर्वांत भयावह वाटते. या देशामध्ये साधन सामग्री कमी आहे, या देशामधली माणसे पुरेशी कार्यक्षम नाहीत, वगैरे अनेक गोष्टी आहेत. पण त्यापेक्षा अधिक महत्त्वाची गोष्ट ही आहे की ज्या सरकारकडे आपण आर्थिक नेतृत्व दिले त्या सरकारवर लोकांचा जितका विश्वास असायला

हवा तेवढा विश्वास सरकारमध्ये काही भ्रष्टाचार आल्यामुळे आज राहिलेला नाही. जयप्रकाश नारायणांची चळवळ ही कशावर उभी राहिली आहे ? जयप्रकाश नारायण हे 'सबंध क्रांतीची' जी भाषा बोलताहेत त्या 'सबंध क्रांतीवर' लोकांचे प्रेम आहे का ? 'सबंध क्रांती' लोकांना कळली आहे का ? जयप्रकाशांचा 'सबंध क्रांती' हा गांधीवाद आहे. ही 'सबंध क्रांती' हा सर्वोदय वाद आहे आणि देशातील लोकांना गांधीवाद आणि सर्वोदयवाद पूर्वी कधी मानवला नाही. आणि जयप्रकाशांच्या 'सबंध क्रांती' च्या स्वरूपातही लोक तो मानणार नाहीत. यशवंतराव जयप्रकाशांचं बळ त्यांच्या फक्त एकाच मागणीवर आधारित आहे. त्यांची मागणी एवढीच की या सरकारमधील भ्रष्टाचार दूर झाला पाहिजे. जयप्रकाशांनी हा निषेध नोंदलेला आहे. आणि तो नषेध फक्त लोकांना पसंत आहे. माझा मुद्दा हा की लोकांच्या लक्षात आले आहे की इथे मवाळपणा आहे, आणि अशा परिस्थितीमध्ये सरकारचा विकासाचा कार्यक्रम जर फलदायी ठरला नाही तर आपल्याला आश्चर्य वाटायचे कारण नाही.

दुसरा एक दोष असा दिसतोय की वाढत्या किंमती. मी मघाशीच तुम्हाला म्हणालो मी इथं १०।१२ वर्षापूर्वी व्याख्यान दिले की किंमती वाढताहेत, आणि त्या आवरल्या पाहिजेत. पुढच्या १०।१२ वर्षांमध्ये किमती आणखी कितीतरी वाढल्या. १९६० सालच्या मानाने या आजच्या किंमती या सव्वातीन पट आहेत. माणसाचे उत्पन्न सव्वातीन पटीने वाढले नाही हे उघड आहे. लोकांनी विकासाची किंमत म्हणून महागाई स्विकारायची. महागाईमधून काही त्याग करायचा. एवढा त्याग लोकांना पेलत नाही. लोक त्याग करतात पण त्या त्यागाची सुद्धा काही एक मर्यादा असते. दोन वर्षापूर्वी मी 'महाराष्ट्र टाईम्स' मध्ये एक तडाखेबंद लेख लिहला होता. तो असा की मुंबईतल्या नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी बोनस मागू नये. बोनस मागणे हे गैर आहे. आणि आता माझ्या

लक्षात येते की माझे म्हणणे लोक ऐकणार नाहीत. आज रिझर्व्ह बँकेचे लोक पगारवाढ मागतात, भत्तेवाढ मागतात. स्टेट बँकेचे लोक पगारवाढ मागतात, भत्तेवाढ मागतात. प्राध्यापक लोक पगारवाढ मागतात, भत्तेवाढ मागतात. का मागतात ? नियोजनामध्ये त्याग करणे आवश्यक हे का त्यांना कळले नाही ? त्यांना ते माझ्याइतकेच माहीत आहे. परंतु जो त्याग करायला हवा त्या त्यागाला त्यांच्या दृष्टीने काही मर्यादा आहेत, प्रत्येकाने ही मर्यादा आखून घेतलेली आहे. या मर्यादेच्या पलिकडे त्याग लोकांना जमत नाही आणि महागाईने हा त्याग लादला जातो आहे. गेल्या वर्षी मला अमुक अमुक वेतन मिळाले. यावर्षी मला ५० रुपयांची वाढ मिळाली. पण माझा खर्च जर २०० रु. वाढला असेल तर माझ्या ५० रु. वाढ याला काही अर्थ रहात नाही. परिणाम असा होतो की सगळेच लोक नाराज होऊन नियोजनाची शिस्त, उत्तम शेती करायला लागणारी मनाची शिस्त, उद्योग धंदा उत्तम चालायला लागणारी मनाची शिस्त आणि स्वास्थ्य हे कुठे राहतच नाही.

इतकेच नव्हे तर ही अशी महागाई वाढत गेली तर महागाईमधून मंदी येते. आता ही मंदीची चाहूल गेल्या काही महिन्यामध्ये लागलेली आहे. आणि जर ती मंदी येईल आणि वाढत जाईल तर हजारो लोक बेकार होतील. आणि मग इथं हाहाःकार होईल. किंमतवाढीतून मंदी येते ती अशी; मी माझे उदाहरण देतो, गेल्या वर्षी मी दुधाच्या तीन बाटल्या सरकारच्या दूध केंद्रावरून विकत आणायचो. आता किंमती वाढल्या. मी दोनच बाटल्या आणतो. गेल्या वर्षीपर्यंत मी दरवर्षी तीन सदरे शिवून आणीत असे. या वर्षापासून मी दोनच सदरे शिवून आणू लागलो. आपण सगळी माणसे या पद्धतीने किंमती वाढल्यानंतर गरजा कमी कमी करू लागलो. याप्रमाणे सबंध समाजाची मागणी कमी होते आणि जर मागणी कमी झाली तर उत्पादन कमी होणारच. हे

साधे गणित आहे. किमती वाढत्या राहिल्यामुळे काही काळ उत्पादन वाढत रहाते. पण विशिष्ट मर्यादेनंतर वाढत्या किमतीमुळे वाढते उत्पादन होत नाही. वाढत्या किमतीमुळे मागणी खाली येते आणि मागणी खाली आल्यामुळे उत्पादन खाली येते ही आजच्या मंदीची मीमांसा आहे. जर वाढत्या किमतीला आधीच आवर घातला असता तर आजची मंदी दिसती ना.

वाढत्या किमतीमुळे सबंध समाजामध्ये उत्पादनाच्या बाबतीमध्ये एक विकृती येते. आणि ती विकृतीसुद्धा तितकीच भयावह आहे. जितकी मंदी वाईट तितकी ही विकृतीही वाईट. मी उदाहरण देतो. आम्ही मंदी आहे असं केव्हा समजू ? उत्पादन कमी होत आहे, रोजगारी कमी होत आहे मग आम्ही म्हणतो मंदी येते. पण उत्पादन तेवढेच राहाते. रोजगार तेवढाच आहे. मंदी आलेली नाही पण 'आवश्यक' उत्पादन कमी होत आहे आणि 'अनावश्यक' उत्पादन वाढत आहे. मग आम्ही म्हणतो ही विकृती झाली. मंदी नाही पण उत्पादनाची विकृती आहे. फेब्रुवारीच्या शेवटच्या दिवसात मध्यवर्ती सरकारचे अंदाजपत्रक जाहीर होते. या अंदाजपत्रकाबरोबर वर्षाचा आढावा दिला जातो. या वर्षाचा जो आढावा देण्यात आला आहे त्यामध्ये म्हटले आहे इथं उत्पादन वाढत आहे. पण कशाचे ? रेफ्रिजेटरचे उत्पादन वाढत आहे. एअर कंडिशनचे उत्पादन वाढत आहे. प्रेशर कुकरचे उत्पादन वाढत आहे. पंख्यांचे उत्पादन वाढत आहे. एकंदर उत्पादन एवढे एवढे. त्याचे जर आपण दोन भाग केले चैनीच्या वस्तू–अनावश्यक वस्तू हा एक भाग. दुसरा भाग– जीवनावश्यक वस्तू, सामान्याला हव्या असणाऱ्या वस्तू. तर उत्पादन तेवढेच राहून किंवा वाढूनही आवश्यक वस्तूंचे उत्पादन कमी झाले तर ही विकृती आहे. ही विकृती अजूनपर्यंत आमच्या

लक्षात आली नव्हती. एक पाकिस्तानी अर्थशास्त्रज्ञ महबुबउल हक याने पहिल्याने हा दावा मांडला आणि नंतर भारताच्या पंतप्रधानांनी त्या विचाराचा पार्लमेंटमध्ये उल्लेख केला. त्यानंतर आमचे अर्थशास्त्रज्ञ जागे झाले. वाढ अनावश्यक वस्तूंची झाली आहे. प्रेशर कुकरचं उत्पादन वाढत आहे पण त्या प्रेशरकुकरमध्ये शिजवायचं जे अन्न त्याचे उत्पादन वाढत आहे का ? रेफ्रिजेटरचे उत्पादन वाढत आहे पण त्या रेफ्रिजेटरमध्ये दूधदूभते ठेवायचं त्याचं उत्पादन वाढत आहे का ? आता लक्षात येईल– उत्पादनाची विकृती म्हणजे काय ते. भाववाढ जशी होते त्याप्रमाणे नुसती मंदी येईल असे नव्हे तर त्याप्रमाणे ही विकृती वाढत जाते. मी तुम्हाला उदाहरण देतो. जशी भाववाढ होते त्याप्रमाणे देशातील विषमता वाढते. गरीब आणखी गरीब होतात, श्रीमंत आणखी श्रीमंत होतात. मग जे अधिक श्रीमंत झाले त्यांच्यासाठी लागणाऱ्या वस्तू ह्या साहाजिकच अधिक उत्पन्न व्हायला हव्यात. आणि जे अधिक गरीब होतात त्यांच्यासाठी लागणारे उत्पादन हे पूर्वीपेक्षा करायला हवे. ह्याच पद्धतीने, तुमच्या लक्षात येईल की, आवश्यक वस्तूंचे दुर्भिक्ष होत आहे. कारण म्हणजे भाववाढ.

सरकारने जे कर योजावयाचे ते कर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कर. वस्तूंवरचे कर हे अप्रत्यक्ष कर म्हणतात. ते वाढताहेत. त्यामुळे वस्तूंच्या किमती वाढताहेत. आणि वस्तूंच्या किमती वाढल्यामुळे लोकांच्या हातातून वस्तू दिसताहेत. पण प्रत्यक्ष कर–संपत्तीवरील कर, उत्पन्नावरील कर हे ज्या प्रमाणात वाढायला पाहिजेत त्या प्रमाणात वाढत नाहीत. गेल्या २५ वर्षांमध्ये अप्रत्यक्ष कर १८ पटीने वाढले आणि प्रत्यक्ष कर फक्त ८ पट वाढले आहेत. म्हणजे श्रीमंतावरील कर गेल्या २५ वर्षांमध्ये ८ पटीने वाढले आणि सामान्यांवरचा करभार १८ पटीने वाढला. याच्यातून विषमता निर्माण होते आणि विषमता निर्माण झाली की विकृती

निर्माण होते. मी तुम्हाला आणखी कांही उदाहरणे देतो.मालाची जी बाजारपेठ असते ती बाजारपेठ श्रीमंतांसाठी किती आणि गरिबांसाठी किती याची आकडेवारी आपण गोळा केली तर ती आकडेवारी अशी आहे– १० टक्के श्रीमंत हे ३५ टक्के वस्तू विकत घेतात आणि राहिलेले ९० टक्के राहिलेले गरीब लोक बाकीचे उत्पादन विकत घेतात. त्यामुळे १० टक्के श्रीमंत लोक ज्या राष्ट्रीय उत्पादनाच्या ३५ टक्के घेतात त्याच तयार करणे हे व्यापाऱ्यांच्या आणि उद्योजकांच्या फायद्याचे होते. अन्न निर्माण करण्याऐवजी प्रेशरकुकर निर्माण करणे हे फायद्याचे होते. तुमच्या जवळचे उदाहरण देतो. हरित क्रांतीचे. हरित क्रांतीमध्ये जे हायब्रीड बियाणे वापरले जाते त्याला पाणी खूप लागते. खत खूप लागते ! पण या जादूच्या बियाण्याने उत्पादन वाढले असले तरी विषमता केवढी वाढली याचा तुम्हाला हिशेब देतो. गव्हाच्या उत्पादनाचा जो खर्च येतो त्याची हिस्सेवारी आपण जर काढली तर ती हिस्सेवारी अशी आहे : एकंदर उत्पादन खर्चापैकी ४० टक्के खर्च हा खतावर होतो. ३० टक्के खर्च हा व्याज आणि इतर भांडवलावर होतो. असा ७० टक्के. ५॥ टक्के खर्च हा पाण्यावर होतो. २॥ टक्के खर्च बीबियाण्यावर आणि जंतुनाशकावर होतो. आणि बाकी राहिलेला २२॥ टक्के खर्च हा माणूस आणि बैल यांच्यावर होतो. आणि माणसाला त्यातील ११॥ टक्के आणि बैलाला ११ टक्के असा हा खर्च होतो. एकंदर जो आपण खर्च करतो त्या खर्चातील माणसाचा वाटा किती ? ११॥ टक्के. जे उत्पादन आपण करू ते विकत घ्यायचं आहे. जे विकत लोक घेतील त्यातील जे मजूर असतील त्या मजुराला त्या उत्पादनाचा वाटा किती येईल ? ११॥ टक्के. जुन्या पद्धतीने शेती केली असती तर मजुराचा उत्पादन विकत घ्यायचा वाटा अधिक असता. हा असा जर तुम्ही विचार करत गेला असता तर लक्षात येईल की गेल्या काही वर्षांमध्ये किंमतवाढीमुळे, आणखी

इतर काही कारणामुळे विषमता सारखी वाढते आहे.

विषमता वाढते पण लोकांच्या अपेक्षाही भलत्याच मोठया होऊ लागतात. हे जे १० टक्के श्रीमंत त्यांची राहणी ही लोकांना आदर्शवत वाटू लागते. त्यांच्या मुली अमुक प्रकारचा पोषाक करतात. त्यांचे मुलगे हे तमूक प्रकारच्या हॉटेलात जातात. मग ते आदर्श ठरतात. मग सामान्यानाही तो आदर्श हवासा वाटतो. परंतु तो आदर्श साध्य होत नाही. तोपर्यंत सामान्यही 'ठेविले अनंते तैसे रहावे' असे न म्हणता पगारवाढ मागू लागतो. त्यासाठी मग संपावर जातो. उत्पादनामध्ये मग घट येते. हे दुष्ट चक्र सुरूच राहते आणि जोपर्यंत हे चालू आहे तोपर्यंत या देशाची परिस्थिती सुधारेल अशी मला शक्यता दिसत नाही. मग त्या परिस्थितीत करायचं काय? उघड आहे. जर हे तीन दोष - तीन कारणे ( सरकारचे स्वरूप हे एक कारण, भाव वाढ दुसरे कारण, विषमता तिसरे कारण ) दूर करायची तयारी आहे का ? किंमतवाढ हाच दोष घ्या. असे सांगण्यात येते की किंमतवाढ जगभर झाली आहे. तो काही आमचा दोष नाही. मी पुष्कळदा माझ्या कॉलेजच्या प्राध्यापकांना म्हणतो की मुलं अलिकडे अशी अशी वागताहेत. अलीकडे अभ्यास करीत नाहीत. लायब्ररीत दिसत नाहीत. उनाडटप्पूपणा करताहेत. मग माझे सहकारी मला सांगतात आपण कशाला मनाला लावून घेता ? सगळयाच कॉलेजात असं घडतंय. याच पद्धतीत असं जर पुढारी म्हणू लागले जर जगभर भाववाढ होते तर आम्ही आमच्या मनाला-लावून का घ्या ? जागतिक भाववाढ अलिकडली आहे, ही गोष्ट फारशी खरी नाही. आणि जागतिक भाववाढ ही मोठी नाही आहे. भारतातील ही भाववाढ ही जुनी आहे. आणि भारतातील भाववाढ ही मोठी आहे. म्हणजे हा प्रश्न आमचा हा असा मानला पाहिजे. तो इथं उद्‌भवला आहे. आमच्या काही वाग-

ण्यांतून, आमच्या कांही कार्यक्रमातून उद्‌भवला आहे. जगभर भाववाढ होण्याचे एक कारण असं आहे की जगभर तेलाचा पुरवठा कमी झाहे हे अलिकडचे कारण आहे. पण आमची इथली भाववाढ जुनी आहे. आणि ती मान्य करायला हवी. आणि जर मान्य केली तरच फक्त आपण तिची कारणे दूर करायचा प्रयत्न करू.

इथले शासन हे लोकशाहीच्या नावाखाली दुर्बल झाले आहे. हो नाही म्हणायला सरकारनं शिकल पाहिजे - हे हे होणे नाही - हे नियमात बसत नाही - याचा अग्रक्रम वरचा येत नाही - हे नियमात बसत नाही. म्हणून मी हे करणार नाही - मग पु. ल. देशपांडे म्हणतील इथं एखादी कलेची ॲकॅडमी काढा. दुसरे कोणी साहित्यिक म्हणतील इथं नाटयांची ॲकॅडमी काढा. मी इथं संख्या शास्त्राची संस्था काढा. सगळा कार्यक्रम राबवीत असतांना इग्रजीमध्ये अशी म्हण की ' सीझर्स वाईफ् मस्ट् बी अबव्ह सस्पिशन ' ह्या पद्धतीने सरकारने आपले वागणे अत्यंत स्वच्छ ठेवले पाहिजे. आणि ही स्वच्छता जर ठेवता येत नसेल तर कार्यक्रमानंतर कार्यक्रम सरकारने जरी दिले तरी त्यावर विश्वास बसणार नाही. मी तुम्हाला उदाहरण देतो. कालच्या महाराष्ट्र सरकारच्या अंदाजपत्रकामध्ये रोजगार हमी योजनेसाठी ५० कोटी रुपये बाजूला ठेवले आहेत. ही उत्तम गोष्ट केली आहे. मी याबद्दल सरकारचे अभिनंदन करीन. माझ्यासारखा एखादा अध्यापक हा कार्यक्रम चांगला म्हणतो एवढचा शिफारशीवर तो यशस्वी होत नाही. त्यासाठी सरकारने बळकटी आणायचे मार्ग कुठचे हे ठरवून त्याप्रमाणे बळकटी कमावलीच पाहिजे आणि जर ही सरकारला बळकटी आली नाही तर हे सरकार इथे विकास होण्याची शक्यता नाही. लोक चीनचा दाखला देऊ लागले आहेत. तिथे एक बळकट शासन आहे. आता ह्या शासनाच्या मागे एक

तत्त्वज्ञान उभे आहे की काय हा आणखी एक वेगळा विचार. इथले शासन बळकट नाही. हा फरक आहे. किमती रोखायला पाहिजेत पण किमती रोखायला लागल्याबरोबर धनिक लोक विशेषत: उद्योजक तक्रार करतील. की मंदी होत आहे. मंदी सरकारच्या भाववाढ विरोधी धोरणामुळे, परत भाववाढ विरोधी केलेल्या इलाजांमुळे निर्माण झाली नसून त्याच्या आधीच निर्माण झाली आहे. सरकारने फारशी काळजी करू नये - माघार घेऊ नये. सरकारने श्रीमंतावरील करही वाढविले पाहिजेत. विषमता कमी करण्यासाठी इतर उपायही योजले पाहिजेत.

हे सर्व सरकारने करायचे तर जनसामान्यांना फार मोठी गोष्ट करावी लागेल. आतापर्यंत गेल्या २५ वर्षांमध्ये असं घडलं की सरकार वेगळे आणि जनता वेगळी. आम्ही मागणी करायची आणि सरकारने त्या मागणीनुसार हा कार्यक्रम तो कार्यक्रम असा हाती घ्यायचा. ही जी सरकार आणि लोक यांच्यामधील तफावत ती फार ठेवून चालणार नाही. जशा काही सर्व जबाबदाऱ्या सरकारवर, आमच्यावर जबाबदाऱ्या काही नाहीत. सर्व नीतिमत्ता ही सरकारची, आमची नीतिमत्ता कांही नाही. ही गोष्ट महाभयानक आहे. मी दोन उदाहरणे देतो : हायब्रीड बियाण्यांचा निर्माता नॉर्मन बोर्लो ह्याने गेल्या काही दिवसामध्ये एक मुलाखत दिली आहे. तो म्हणाला की, पहिल्या वेळी मी हे मिश्र बी काढलं त्यावेळेला मला उमेद होती की १० वर्षांमध्ये सगळं जग हे भरपूर अन्न मिळून संतुष्ट होऊन जगेल. पण आज मला ही उमेद राहिली नाही. त्याचे कारण असे– आज लोकसंख्येच्या वाढीचा वेग भयानक वाढला आहे. म्हणजे हे जे हायब्रीड बियाणे त्या बियाण्यापेक्षा–मानवाची निर्मिती, अधिक जोराने माणसांची ब्रीड हाय होत आहे. ही जर वाढ झाली तर हेच सरकार आज यापेक्षा अधिक बलवान ही सरकार आले तरी

अन्नाचा प्रश्न सुटणार नाही कम्युनिष्टांच्याही लक्षात हे आले आहे. पूर्वी कम्युनिष्ट असे मानीत लोकसंख्या वाढली आहे वगैरे जो सिद्धांत आहे तो खास भांडवलशाही सिद्धांत आहे. एकदा कम्युनिस्ट पद्धत आली म्हणजे मग सर्वांना भरपूर अन्न, सर्वांना भरपूर वस्त्र देऊन आबादीआबाद निर्माण करता येईल. पण आज चीनमध्ये हेही मानले जात आहे की लोकसंख्येच्या वाढी-वर आवर घातला पाहिजे आणि ही लोकसंख्येची वाढ जर कमी करता आली नाही तर इथं बाका प्रसंग येणार आहे. दुसरे उदा–हरण घ्या. भाववाढ होते वगैरे सगळे बरोबर आहे. त्या बरोबर लोक चिडले आहेत हेही बरोबर आहे. पण लोकांनी चिडून पुन्हा शिस्त मोडायची हे मला पटत नाही. भिलाईच्या पोलाद कारखान्यामध्ये उत्पादनात खंड पडण्याचा काळ हा उत्पादन होण्याच्या काळापेक्षा ज्यास्त आहे. एवढेच नव्हेतर जे उत्पादन होत असे ते उत्पादन आता होऊच दिले जात नाही. मजूर आपल्या घरी ज्या चुली मांडीत त्या आता कारखान्याच्या दर्शनी भागातच मांडीत आहेत. उत्पादन खाली येत आहे. एकदा आम्ही रेल्वेची चाके कोरियाला निर्यात करीत असू. पण आता कोरियाकडून रेल्वेची चाके आयात करीत आहोत. आणि ही चाके यंत्रे तयार करतात ती यंत्रे आता वापरली जात नाहीत. ती भिलईहून बंगलोरला उचलून न्यायची होती. त्याला मजूरांनी विरोध केला. चाके होत नाहीत आणि चाके तयार करणारी यंत्रेही उचलता येत नाहीत. ती यंत्रे आता गंजू लागली असतील.

मला असं दिसतं ती जी किमान शिस्त कमी होत आहे. उत्पादन कमी होतं त्याचा आलेख मांडता येतो, किती मजुरीचे दिवस बुडाले त्याचा आलेख काढता येतो. पण शिस्त कमी होते याचा आलेख जरी काढता आला नाही तरी तुमच्या आमच्यापैकी प्रत्येकाला ज्यांनी १९४७ सालापासून पुढची वर्षे पाहिली आहेत

त्याला मनाशी हा आलेख काढता आला पाहिजे. ही केवळ जबाबदारी ही सरकारचीच आहे–आम्ही मात्र साळसूद ही भूमिका चालणार नाही.

उपाय योजना करायला एखादे दशकच फक्त उरलेलं आहे. हा एका दशकाचा हिशेब गेली २।३ दशके लोक ऐकत आलेले आहेत. १९५०।६० या कालामध्ये एकच दशक उरल्याचे लोक म्हणत होते. १९६०।७० मध्ये एकाच दशकाची संधी उरल्याचे लोक म्हणत होते. त्याच पद्धतीने तुम्ही म्हणाल हाही वक्ता एकच दशक उरल्याचं म्हणतोय. कोणी आणखी दोन दशके उरल्याचे म्हणेल. होय. पण अराजकाचे असे दशक मिळबायचे आहे काय ? हा माझा प्रश्न आहे. जी पुढची दशके मिळत जातील ती दशके अधिकाधिक भ्रष्टाचाराची, अधिकाधिक दुर्भिक्षाची, अधिकाधिक हिंसेची, अधिकाधिक अराजकाची असतील ती दशके अंगावर ओढून घ्यायची नसतील तर मी म्हणेन की वेळ थोडा उरलेला आहे. थोडक्यात काय चाललं आहे हे जाणून घेऊन त्यावर उपाय योजना करणे हे आवश्यक झालं आहे.

तुमचा मी आभारी आहे. असेच प्रेम राहू द्या !

त्र्यंबक कृष्ण टोपे

# " समाज सुधारणेच्या समस्या "

श्री. त्र्यंबक कृष्ण टोपे

जन्म: १९१४, येवला जि. नासिक

शिक्षण:. बी. ए. १९३६, एम्. ए. १९३८, एल्. एल्. बी. १९४०
१९७१ पासून मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू.

१९३९ ते १९४७ रामनारायण रुईया कॉलेज, मुंबई येथे संस्कृतचे प्राध्यापक.

१९४७ ते १९५८ सरकारी लॉ कॉलेजमध्ये कायद्याचे प्राध्यापक.

१९५८ सरकारी लॉ कॉलेजचे प्राचार्य.

विद्यापीठाच्या विविध समित्यांवर काम केले.

भारतीय लॉ कमिशनचे ६ वर्षे सभासद, महाराष्ट्र सामाजिक परिषदेचे अध्यक्ष म्हणुन काही दिवस काम.

महाराष्ट्र लीगल ॲडव्हायझरी कमेटीचे सभासद, १९४३ ते १९६१ ऑफिसर U. O. T. C. & N. C. C. म्हणून.

" Why Hindu code, A Modern sage "
" The Constitution of India " ही दोन पुस्तके फारच गाजलेली आहेत.

" Bill of Right's " या विल्यम ओ. डग्लस यांच्या पुस्तकांचा श्री. टोपे यांनी मराठीमध्ये " चिन्मय हक्क सूत्रे " म्हणून अनुवाद केला आहे.

" हिंदू समाजाचे वैशिष्टच आहे की कोणाही एका माणसाला मोठा करून त्याचा देव बनवून देव्हाऱ्यात ठेवायचा पण त्याची तत्त्वे मात्र अमलात आणायची नाहीत. समाजजीवनातील निरनिराळे दोष नाहीसे करण्याचा एक तात्पुरता विचार म्हणजे समाजसुधारणा हे चुकीचे मत आहे समाज पूर्णपणे उजळला गेला पाहिजे असे जोतिरावांचे मत होते. जोतीरावांनी उभे केलेले चित्र हिंदुसमाजाने पुरे केले असते तर, डॉ. आंबेडकरांना वेगळा मार्ग स्वीकारावा लागला नसता. समाजातील विचारवंत कार्यकर्तेसुद्धा जेव्हा मूळ गाभ्याला स्पर्श न करता नुसता घोळ घालत राहतात तेव्हा सामाजिक सुधारणांच्या मूळ मूल्य विचारांकडेच दुर्लक्ष होते "

श्री. खंडकर, माझे मित्र श्री. शंकरराव करंबेळकर आणि मित्रहो,

या व्याख्यानमालेसाठी मी येथे येण्याचे कबूल केले त्याला अनेक कारणांपैकी एक कारण असे आहे की ४-५ महिन्यांपूर्वी कराडला दुसऱ्या एका कामाकरता मी येण्याचे कबूल करूनसुद्धा येऊ शकलो नाही आणि म्हणून दिलेलं वचन पाळण्याचा योग आला. मी हे निमंत्रण स्वीकारले आहे.

यशवंतरावजींना ज्या विषयांसंबंधी आत्मीयता आहे त्यांपैकी सामाजिक सुधारणा हा त्यांचा आवडता विषय आहे. आणि म्हणून ज्यावेळेस या व्याख्यानाचा विषय मी सुचवावा असे मला सांगण्यात आले त्यावेळेस मी हा विषय सुचविला आहे– सामाजिक सुधारणेच्या समस्या.' हा विषय मी घेतला याचे कारण आजची सगळ्यात महत्त्वाची समस्या कोणती असेल तर ती आर्थिक समस्या. आपल्या समाजसुधारणेची समस्या आहे असे मला वाटते, आणि जरी आपल्या आर्थिक समस्या व ही समस्या तशीच राहिली तर समाजाचे भवितव्य फारसे उज्ज्वल आहे असे मला वाटत नाही.

समाज सुधारणा म्हटल्यानंतर जोपर्यंत समाज अस्तित्वात आहे तोपर्यंत सुधारला पाहिजे असल्या प्रकारचा दावा नेहमी मांडण्यात येतो. समाज हा गतिमान असला पाहिजे व तो गतिमान नसला आणि स्थितप्रज्ञ असला तर ज्याप्रमाणे बंदिस्त असलेले पाणी हे शुद्ध नसते, त्यात किडे पडतात पण वाहत्या पाण्यामध्ये मात्र जीवन असते त्याप्रमाणे स्थितप्रज्ञ असलेला समाज हा शेवटी विनाशाला जातो परंतु ज्या समाजामध्ये वाहण्याची शक्ती आहे, नवीन प्रवाह आतमध्ये सामावून घेण्याची शक्ती आहे असा समाजच जगू शकतो, टिकू शकतो. जगाचा इतिहास आपल्याला

या गोष्टी स्पष्ट करून सांगतो आहे. मानवी इतिहासामध्ये अनेक समाज उदयाला आले. अनेक संस्कृती उदयाला आल्या. त्यातल्या पुष्कळशा नष्ट झाल्या आहेत. फक्त काही समाजच हे सतत चालू राहिलेले आहेत. अशापैकी भारतीय समाज आहे ही मोठी समाधानाची गोष्ट आहे. गरीब देशातील संस्कृती, तो समाज, इटालीमधील संस्कृती, तो समाज, इजिप्तमधील संस्कृती तो समाज असे कितीतरी समाज उदयाला आलेले समाज असे आहेत की ज्या समाजामध्ये गतिमानता नव्हती ते समाज नष्ट झाले. इतिहासामध्ये संपूर्णपणे ते दाखल होऊन गेलेले आहेत.

आपल्या समाजामध्ये ही गतीमानता होती याचे कारण नवीन विचार ग्रहण करण्याचे, नवीन विचार सामावून घेण्याची ताकत या समाजामध्ये होती. ती ताकत जर नसती तर हा समाज आज ज्या परिस्थितीत आपण पहातो त्या परिस्थितीत नसता. दुसरी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे आमच्या या समाजाला फार मोठे समाजसुधारक मिळालेले आहेत. ज्या ज्या वेळी या समाजावर इतर विचारांचे अनिष्ट असे आक्रमण व्हावयास लागले त्या त्या वेळेला या समाजातील धुरीणांनी नवीन विचार स्वीकारला व हा समाज गतिमान ठेवला आहे. मी फार पूर्वीच्या काळात जाणार नाही. हा विचार अत्यंत महत्त्वाचा असला तरी पण ब्रिटिशांचा अंमल सुरू झाल्यापासून जर आपण आपल्या समाजाचा विचार केलात तर समाज असे धुळीला गेलेले आहेत की ज्यांनी नवीन कल्पना स्विकारल्या आहेत. समाजाला नवीन जीवन दिलेले आहे आणि समाज हा पुढे चालू ठेवला आहे. ब्रिटिशांचे राज्य आल्यानंतर ख्रिश्चन धर्माचा प्रसार करणारे धर्मगुरू येथे आले आणि त्या धर्मगुरूंच्या शिकवणुकीचा परिणाम ख्रिस्त धर्माचा जो एक महत्त्वाचा गुण आहे की भक्ती आणि दया- शिकवणु- कीचा परिणाम होऊन पुष्कळसे लोक हिंदू समाज सोडून त्या

धर्माकडे आकर्षित झाले आणि आपली कल्पना असेल की फक्त अशिक्षित लोकच तिकडे गेले आहेत तर ती चुकीची आहे. आपल्याकडील पुष्कळसे सुशिक्षित लोक त्यात काही शास्त्री पंडित सुद्धा होते नामवंत शास्त्री गोरे म्हणून त्यामध्ये होते, ते ख्रिस्त धर्माकडे आर्कषित झाले होते. तर ही जर विचारसरणी, त्या विचारसरणीचा अभ्यास करून त्या भिन्न समाजामध्ये नवीन विचार आणण्याचा प्रयत्न धुरिणांनी केला आणि समाजसुधारणा केली. राजा राममोहन रॉय यांनी ब्राम्हो समाज स्थापन केला आणि मग ख्रिस्त धर्मामध्ये जी प्रार्थना आहे, एक देव आहे इतर मूर्तिपूजा नाही. सर्वांनी एकत्र येऊन परमेश्वराचं भजन करावयाचं आहे, जातिभेद मानावयाचा नाही या गोष्टी राजा राममोहन रॉय व त्यांच्या लोकांनी ब्राम्हो समाजात आणल्या आणि समाजाला एक नवीन बैठक दिली. महाराष्ट्रामध्ये न्यायमूर्ती रानडे यांनी आणि इतरांनी प्रार्थनासमाजाची स्थापना करून त्याला एक वेगळी बैठक दिली आणि ख्रिस्त धर्मामध्ये ज्या गोष्टी आहेत त्या आपल्यामध्ये आहेत हे दाखविण्याचा प्रयत्न केला. तिकडे पंजाब-मध्ये मुसलमानाच्या धर्मांचा प्रसाराविरुद्ध या आर्य समाजाची स्थापना झाली आणि आर्य समाजाची ही मूर्तिपूजा हिंदू समाजाला देखील मानवली नाही आणि एक वेगळे तत्वज्ञान घेऊन हिंदू समाजामध्ये सुधारणा होऊ लागलेल्या आहेत. हा समाज सुधा-रणेचा रोख एक ब्रिटिश अमदानीत जर आपण पाहिला तर फारसा चालू आहे तर फार मोठे सुधारक निर्माण झालेले आहेत. वेगवेगळचा समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्या समस्यांना उत्तरे दिली आहेत आणि ती उत्तरे देताना आज ज्या काही आमच्यापुढे समस्या आहेत, त्यांचा विचार करणारा दुसरा एक महान वारसा समाज सुधारक महाराष्ट्रात झाला आणि त्याच्याइतका सर्वंकष दृष्टीने समाज सुधारणेचा विचार करणारा समाज सुधारक सबंध भारतामध्ये झालेला नाही. आणि तो म्हणजे म. जोतिबा फुले.

त्यांच्या समाज सुधारणेचा जो आवाज का होता त्यांनी ज्या समाज सुधारणेचा चित्रपट केला होता तो चित्रपट जर आपण संपूर्णपणे अमलात आणला असता तर आज ज्या समस्या आपल्यापुढे आहेत त्या दूर झाल्या असल्या. इतर कोणत्याही समाज सुधारकाला ती दृष्टी नव्हती, ती कुवतच नव्हती, असे मी म्हणेन. भारतात पुष्कळच समस्या होत्या, पण जोतिबांनी जे चित्र नवीन समाजाचे त्यांच्याबद्दल रमाबाईनी सांगितले आहे ती चित्रे अमलात आणणेचा जर हिंदू समाजाने प्रयत्न केला असता तर ते चित्र अमलात आणले असते तर आज ती दैन्यावस्था आपल्याला जी समाजात दिसत आहे ती मुळीच दिसली नसती. समाज सुधारण्याच्या समस्या त्यांना पूर्णपणे समजल्या होत्या तरी सर्वंकष दृष्टीने त्यांनी समाज सुधारण्याचा विचार केलेला होता. जे अनिष्ट आहे त्याच्याविरुद्ध त्यांनी चळवळ केली. भ्रूणहत्या किंवा बालहत्या होते असे म्हणून बालहत्या प्रतिबंधक चळवळ त्यांनी सुरू केली. स्त्री शिक्षण आवश्यक आहे त्यांना पटलं आणि त्यांनी स्वतःच्या पत्नीला शिकवून नंतर मुलींकरता शाळा काढल्या आपली जर आठ मुले असतील तर त्यांचे संगोपन करण्याचा प्रयत्न केला. जातिभेद मानव जातीला कलंक आहे हे त्यांना मान्य होतं म्हणून त्यांनी जातिभेदाविरूद्ध, अस्पृश्यतेविरुद्ध शस्त्र उगारले. शेतीकडे सुद्धा त्यांनी त्यावेळी लक्ष दिले होते. शेतीच्या बाबतीत त्यांनी त्यावेळी जे सांगितले होते ते जर ऐकले असते तर धान्याची ही आजची बिकट परिस्थिती आली नसती. सर्व समाजाचा एका बाजूने त्यांनी कधीच विचार केला नव्हता तर समाजाच्या सर्व समस्याचा त्यांनी सर्वंकष दृष्टीने विचार केला होता आणि खरा धर्म हा मानवता आहे हे त्यांनी सांगितले होते. जोतिराव फुल्यांची दरवर्षी पुण्यतिथी करतो, त्याची स्तुतिस्तोत्रं गातो, त्यांचा वारसा सांगतो पण त्यांची शिकवण मात्र अमलांत आणीत नाही. आता हिंदू समाजाचे एक वैशिष्टयच आहे

कोणाही एका माणसाला मोठा करायचं, त्याला देव्हाऱ्यात नेऊन बसवावयाचं, त्याची पूजा करावयाची पण तत्त्वं मात्र अमलात आणावयाची नाहीत. हा एक प्रकारचा आमच्या समाजाचा मोठा महत्त्वाचा भाग आहे असे म्हणावयास हरकत नाही. त्यांनी सर्वंकष अशी समाजसुधारणा देशात आणली पाहिजे असे प्रतिपादन केले होते त्या प्रकारची चळवळ त्यांनी केली होती आणि मित्रहो, सांगतो की भारतातले सगळे समाजसुधारक पाहिले अगदी राजाराममोहन रॉयपासून आजच्या तारखेपर्यंत घ्या. सर्व समाजसुधारकांमध्ये जोतिरावासारखी समाज सुधारण्याची दृष्टी इतर कोणाचीही नव्हती आणि आजही कोणाचीही दिसत नाही. इतकी सर्वंकष दृष्टी त्यांनी समाजसुधारणेची ठेवली होती आणि फार उत्तम असे चित्र होते ते जर पूर्ण केले नाही तर आपल्यासारखे दुर्दैवी आपणच असे म्हणावे लागेल. आमच्या समाजात त्या जोतिरावांच्या सारखा समाज सुधारक दिसला त्याची शिकवण आम्ही आमच्यापुढे ठेवली पाहिजे. एखादा समाज सुधारक त्यांच्याभोवती जो समाज असतो त्यांच्यावर लागू अशी तात्पुरती उपाययोजना करीत असतो. त्याचा अभ्यास केला तर आपणास असे दिसून येईल की समाजसुधारणा ही तात्पुरती असते. एखादा रोग आला आहे. रोगावर आपण औषध देत असतो रोग बरा झाला, औषध सोडून देतो. समाज सुधारणांचा विचार म्हणजे निरनिराळ्या वेळी समाजामधील दोष नाहीसे करण्याचा एक तात्पुरता विचार असल्या प्रकारचं एक मत आहे. पण जोतिरावांचे मत म्हणजे समाज पूर्णपणे उजळला पाहिजे असे होते हे त्यांचे वैशिष्टच कोणत्याही समाजसेवकाला मान्य झालेलं आहे.

आगरकरांनी सुद्धा समाजसुधारणेच्या कार्यामध्ये स्वतःला वाहून घेतलं होतं पण त्यांच्याबरोबर समाज पुण्यातील मर्यादित होता. फार मोठा समाज नव्हता. पण आगरकरांनी समाज सुधारण्याची

समस्या सोडविताना एक जी दृष्टी दिली होती ती महत्त्वाची आहे आणि ती आजसुद्धा आपल्याला आवश्यक दृष्टी आहे. ही दृष्टी म्हणजे बुद्धीची परंपरा. ही फार मोठी देणगी आगरकरांनी दिली. त्यांच्याजवळ बुद्धीची परंपरा आहे. ज्या संस्थेचे फायदे आहेत त्यांनी आमचे प्रश्न सोडविले पाहिजे. समाजसुधारणेच्या प्रश्नावर पुष्कळ लोक सांगतात की, आमचे संतसुद्धा समाज-सुधारक होते. त्यांचा मानवतावाद होता हे मी मान्य करतो. परंतु संतांच्या शिकवणुकीमध्ये भूतदया अनुकंपा असल्या प्रकारची होती. एक प्रकारची लोकांवर उपकार करण्याची वृत्ती काही ठिकाणी आढळते. आगरकरांच्या बुद्धिवादाच्या परंपरेच्या दृष्टीने तर्कशास्त्राच्या कसोटीवर काही समस्या सोडविता आल्या असत्या. पण आगरकरांचे विश्व हे थोडे मर्यादित होते.

आगरकर काय, किंवा त्यांचे अनुयायी काय, त्यांनी समाजात सुधारणा करण्याकरिता काही गोष्टी घडवून आणल्या पण त्यानंतरचे जे समाजसुधारक झाले त्यांनी समाजाला वेगळ्या दृष्टीने पहाण्यास सुरुवात केली आणि ह्यांमध्ये आंबेडकरांचा उल्लेख करावा लागेल. डॉ. आंबेडकरांचे विचार पाहिले तर ते अगदी खरे होत गेले आहेत. मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह करणारे डॉ. आंबेडकर, चवदार तळ्यावर आम्हाला पाणी पिण्यासाठी मिळाले पाहिजे असा आग्रह धरणारे डॉ. आंबेडकर आणि मी हिंदू म्हणून जन्मास आलो आहे पण हिंदू म्हणून मरणार नाही असे जाहीर करणारे डॉ. आंबेडकर. डॉ. आंबेडकरांच्या ज्या अपेक्षा होत्या त्या हिंदू समाजाने पुऱ्या केल्या नाहीत ही खरी शोकांतिका आहे. हे मी सांगितलेच की ज्योतिरावांचे जे चित्र होते ते हिंदू समाजाने पुरे केले असते तर डॉ. आंबेडकरांना जो मार्ग स्वीकारावा लागला तो स्वीकारावा लागला नसता पण आमच्यामध्ये हा दोषच आहे कोणालाही मोठे करायचे,

देव्हाऱ्यामध्ये बसवायचे, मोठे करावयाचे. जसे आम्ही गांधीजींच्या बाबतीत करतो. गांधी जयंतीला आणि ३० जानेवारीला महात्मा म्हणून त्यांचा आदर करतो, पूजा करतो, नमस्कार करतो आणि घरी जाऊन त्यांची शिकवणूक विसरून जातो. हा दोष कसा जाईल. याचे विवेचन मी नंतर करणारच आहे. आपण सगळे आमचे कोणी जे होऊन गेले आहेत त्यांची पूजा आम्ही केलेली आहे तत्त्वे मात्र अंमलात आणण्याचे टाळले आहे. ही आमच्या समाजाची शोकांतिका आहे. डॉ. आंबेडकरांनी मंदिरात प्रवेश करण्याकरिता सत्याग्रह केला पण नंतर मात्र त्यांनी विचार केला की त्याना मानव म्हणून जगण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. पण त्याच्यापुढे जाऊन पहिली गोष्ट जी आंबेडकरांनी केली ती अशी की अस्पृश्यांना राजकीय हक्क मिळाले पाहिजेत आणि समाजसुधारणेचा एक भाग म्हणून अस्पृश्यांना राजकीय हक्क मिळणार हे उघड झाले. ते आमचे हक्क आहेत. ते आम्हांला मिळाले पाहिजेत ते कोणाच्याही कृपेवर अवलंबून नाही, तर ते मानव म्हणून आमचे हक्क आम्हाला पाहिजेत. समाजसुधारणेच्या इतिहासामध्ये ही एक महत्त्वाची अशी गोष्ट आहे, टप्पा आहे. १९३९ चा पुणे कराराचा कायदा पाहिला तर पुणे कराराला आमचे डॉ. आंबेडकर अस्पृश्याना कायदा वगैरे गोष्टींना फारसे महत्त्व देत नाहीत. याशिवाय तुम्ही आम्हांला राष्ट्रीय हक्क कोणते देणार ? राऊंड टेबल कॉन्फरन्स घेऊनसुद्धा त्यांनी हा प्रश्न विचारला होता. पुणे कराराच्या बाबतीतील भूमिका ही अशी होती आणि ती भूमिका पुढे कायम ठेवली होती हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. तर समाजवादाचा विचार करताना अस्पृशता नष्ट करा. या विचाराला आंबेडकर तयार नव्हते. तर मानव म्हणून आम्हाला जे हक्क आहेत ते राष्ट्रीय हक्क आम्हाला द्या. आणि असा पुढे त्यांच्या समाजवादाचा प्रवाह सुरू झालेला आहे. ते घटना समितीच्या मसुदा समितीचे अध्यक्ष

होते. त्यावेळी संविधान तयार करताना त्यांनी जे शेवटचे भाषण केले ते भाषण समाजधूरिणांच्या दृष्टीने फार महत्त्वाचे होते. ते म्हणाले, मी ज्यावेळी घटना समितीमध्ये आलो तेव्हा अत्यंत कोत्या रीतीने आलो, स्वार्थी भावनेने आलो की मला माझ्या जमातीचे कल्याण साधावयाचे आहे पण नंतर माझ्यावर जी जबाबदारी टाकण्यात आली त्यामुळेच संविधान करण्यामध्ये मला हिस्सा मिळाला हे मी माझे भाग्य समजतो. त्यांनी सांगितले की ज्यावेळी भारतातील प्रत्येक नागरिक स्वतःचा धर्म, स्वतःचा पंथ, स्वतःची जात, स्वतःची भाषा याला दुय्यम स्थान देईल आणि भारताचा नागरिक या दृष्टीने त्याचे कर्तव्य करील आणि त्या उद्देशाने वागेल त्याच वेळेला या संविधनाचे साफल्य झाले असे म्हणता येईल. पण हे जर आम्ही केले नाही तर परमेश्वर करो तसे न होवो जे स्वातंत्र्य आम्ही एवढ्या कष्टाने मिळवले आहे त्या स्वातंत्र्याला पण जखम होण्याची पाळी न येवो. शेवटच्या अंकात त्यांनी सर्वच सुधारणेचे सार आणले आहे.

नवीन जीवनाला आम्ही ५० सालापासून सुरुवात केली. त्या जीवनामध्ये त्या गोष्टीनी आम्ही जीवनाकडे पहावयास पाहिजे होते ते जर पाहिले असते तर या समस्या आमच्यात निर्माण झाल्या नसत्या आणि आंबेडकराचाच पुढचा वारसा पाहिला. अस्पृश्यता कायद्याने नष्ट झालेली आहे. संविधानामध्ये १७ वे कलम आहे. ५५ साली आपण कायदा केला होता पण ती जीवनातून नष्ट झाली आहे का? आपण आपल्या मनाला विचारूया आणि याचे उत्तर कोण 'हो' म्हणून देत असेल तर मला फार आनंद वाटेल आणि आता जो प्रश्न यापुढे आपल्यापुढे उभा रहाणार आहे तो राजकीय हक्कापुरता मर्यादित नाही तर आर्थिक समतेशी निगडित झाला आहे आणि तो आपणापुढे फार

फार मोठा प्रश्न निर्माण होणार आहे. राजकीय दृष्टया जरी अस्पृश्यता नष्ट झाली असली, जीवनातून ती नष्ट झाली की नाही हा प्रश्न नाही पण जोपर्यंत आर्थिक समता निर्माण होत नाही तोपर्यंत खरी समाजसुधारणा झाली असे मी केव्हाही मानायला तयार नाही. आम्ही पुष्कळ प्रकारचे कायदे केले आहेत. कायद्यांनी समाज सुधारणा व्हावी असा प्रयत्न आहे. पुष्कळ प्रकारचे कायदे झाले आहेत. पुष्कळ प्रकारच्या दुरुस्त्या झाल्या आहेत. अकबराने सतीला बंदी करावी असा कायदा त्यांनी त्या काळी केला होता, दुसरा, विवाहाचे वय, मुलीचे किमान १४ असावे लहान विवाहास प्रतिबंधक असा कायदा केला होता. हे ऐने अकबरीत होतं. अकबराने त्यावेळी असल्याप्रकारचे कायदे केले होते, नियम केले होते. आज आम्ही ५६ साली हिंदू विधवा पुनर्विवाहाचा कायदा केला. १९२९ साली बालविवाह प्रतिबंधक कायदा केला. हिंदू कायद्यात पुष्कळ प्रकारचे बदल करून घेतले. ५५ साली हिंदू विवाह कायदा करून घेतला. एक पत्निव्रत स्वीकारलं. हुंडा प्रतिबंधक कायदा केला. पण याने काही समाजसुधारणा झाली नाही, आज समाजसुधारणा ही केवळ सामाजिकदृष्टया समजून घ्यायला पाहिजे अशी महत्त्वाची समस्या आहे. आणि आर्थिक दृष्टया आर्थिक समता आली नाही तर सर्व मानव समान आहेत, सर्वांना सारखेच राजकीय हक्क आहेत, मानव मानवासारखाच आहे. याला काही एक अर्थ नाही. संविधानामध्ये ज्या काही गोष्टी त्यांनी अंतर्भूत केल्या होत्या त्या भारतीय समाजाच्या संपूर्ण समस्या आकलन करून भारतीय समाजाला उपयोगी पडेल असल्याप्रकारचे संविधान आपल्याला करायचे आहे ही भावना त्यांनी मनामध्ये संपूर्णपणे ठेवली नव्हती ही दुःखाची गोष्ट आहे. गेल्या २५ वर्षांमध्ये जे आपल्याला पुष्कळ फायदे मिळालेले दिसतात. मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक चर्चा झालेली दिसते

त्याचे खरे कारण असे आहे की आपल्या समाजाचे वर्गात समाजाची शक्ती समाजाची पुढील वाट आहे आमच्या व्यापारातील दोष सर्व गोष्टींचा विचार करून संविधान तयार करायला हवे होते तसल्या प्रकारचे संविधान दुर्दैवाने झाले नाही. आर्थिक विषमता आणि समाजाची घडी विस्कळीत होण्याची आज पाळी आली आहे ती आर्थिक विषमता असल्यामुळे सामाजिक सुधारणेच्या समस्याचा विचार करताना १९७५ साली आर्थिक समता आल्याशिवाय काही होणार नाही ही गोष्ट आपणास मान्य करावयास पाहिजे. आर्थिक समतेची सुधारणा ही सामाजिक क्रांतीशिवाय होणार नाही. तात्पुरती उपाययोजना करून, तात्पुरते उद्योग निर्माण करून आर्थिक समतेच्या आजच्या समस्या सुटणार नाहीत. त्याला समाजसुधारणा पुऱ्या पडणार नाहीत. त्याला पाहिजे सामाजिक क्रांती.

आपल्यापैकी जे माझ्या बरोबरीचे असतील किंवा माझ्या अगोदरचे असतील त्यांची ३० व ४२ साल पाहिलेली आहेत. स्वातंत्र्यपूर्व भारत पाहिलेला आहे. आणि स्वातंत्र्यानंतरचा भारत २५ वर्ष पाहिलेला आहे, त्यांना एक गोष्ट खटकत असेल ती अशी की आपली जीवनमूल्ये काय आहेत ? ही जीवनमूल्ये तीच चालू होती जी ४२ साली ४७ साली होती ती समाजाने मागितलेली जीवनमूल्ये होती. त्यामुळे समाज हा बलवान होता, प्रबळ अशा शक्तीशी सामना करण्याची हिंमत त्या समाजामध्ये होती. अर्थात गांधीसारखा फार मोठा नेता त्यावेळी होता हे भाग्याचे लक्षण आहे यात दुमत होणार नाही. अर्थात ती जी सामाजिक मूल्ये आधी पत्करली होती ती समाजामध्ये आज आहेत का ? आज सगळ्याच देशात सगळ्या समाजात, वेगळ्याप्रकारचे जीवनमूल्ये झालेली आहेत आणि कोणताही समाज त्याच्या फायद्याकरिता जीवनमूल्ये लागतात त्यापेक्षा वेगळ्या प्रकारची जीवनमूल्ये

झालेली आहेत असे आपणास दिसून येईल, ही शिस्त जीवनात कोणत्याप्रकारे निर्माण झालेली आहे. कोणताही समाज शिस्तीशिवाय जगू शकेल काय? सामाजिक जीवन शिस्तीशिवाय होऊ शकणार नाही आणि बेशिस्त बेबंदपणा आणि गरीब रहात असून देखील त्या श्रीमंत राजासारखी असण्याचा दावा धरणे हे गांधीजींनी कधीही आम्हाला शिकविले नाही. अर्थात गांधीजींनी आम्हाला शिकविले, गांधीजींचा समाजसुधारक म्हणून आम्ही उलेख करतो की सामाजिक क्रांती टाळावयाची असेल आणि आमचा समाज थोडचा जुन्या वळणावर आणावयाचा असेल तर गांधीजीच्या मार्गाने जाण्याशिवाय दुसरा मार्ग नाही. जर गांधीजीनी सांगितलेल्या मार्गाने गेला नाहीत तर सामाजिक क्रांती अटळ आहे हे आपण लक्षात ठेवले पाहिजे, गांधीजींच्या विचारसरणीला प्रतिगामी म्हणणारे काही आहेत. त्याच्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. विशेषतः गांधीजींनी जी काही विशिष्ट मूल्ये दिली होती, समाजाला पाळण्याकरीता तो त्याचा फार मोठा प्रयोग होता. समाज सुधारावयाचा असेल तर त्यांनी सांगितले खूप काम करा, मेहनत करा, कष्ट करा हा संदेश दिला होता. आणि जीवन जे जगावयाचे आर्थिक जीवन जे जगावयाचे, गरजा वाढवू नका गरजा कमी करा, थोडी असलेली संपत्ती या देशाच्या सर्व लोकाना पुरवावयाची असल्यास अपरिग्रह वृत्ती हीच ठेवली पाहिजे त्या शिवाय तरणोपाय नाही, गांधीजींनी हे शिकविले होते.

आपण विचार करा की ४७ सालानंतर हे आम्ही किती स्विकारलं? आमच्या जीवनात हा समाजसुधारणेचा महान मंत्र होता ज्या राष्ट्रांनी तो स्वीकारला त्यांना मी म्हणतो चीनचे उदाहरण मी देतो आम्ही ४७ सालानंतर स्वतंत्र झालो. चीन ५० साली झाला पण माओनी प्रत्यक्षात अमलात आणलं ते असं की बाबांनो

खूप काम केलं पाहिजे आणि आपल्या गरजा शक्य तितक्या कमी करावयास पाहिजेत. चौ एन लॉय प्राईममिनिस्टर सायकलवर बसून जातो. असल्या प्रकारचे कठोर जीवन, खडतर जीवन त्या राष्ट्राने स्विकारले. आपल्या राष्ट्राची शक्ती जगात काय आहे हे आपल्याला वेगळे सांगायला नको. आपल्याला सुदैवाने गांधी मिळाले पण त्यांचा आम्ही शेवटी देव केला आणि शिकवण विसरलो आमच्या समाजाच्यापुढे समस्या निर्माण झाल्या. आज जी जीवनमूल्ये आम्ही स्वीकारली आहेत त्या जीवनमूल्यांमुळे काय होणार आहे ? कोणाचाही असल्या गोष्टीवर विश्वास नसेल पण कृष्णाच्या सोन्याच्या द्वारकेने यादवांना खराब केले हे आपण लक्षात ठेवा. सोन्याची द्वारका झाली आणि यादवांत भांडणे झाली म्हणून यादव खलास झाले. आज जी समृद्ध राष्ट्रे आहेत, त्यांची सामाजिक परिस्थिती काय आहे, याचा जर तुम्ही विचार केलात तर आपण जे आहोत ते फार बरे आहोत. हे समाधान फारसे सोपे नाही. तर असे समृद्धीच्या पाठीमागे लागणे हे समाज बलवान करण्याचे लक्षण नव्हे. समाज बलवान होतो तो पैशामुळे होत नाही तर तो जीवनमूल्यांमुळे. आगरकरानी दिलेली बुद्धिवादी परंपरा अमलात आली पाहिजे. त्यांनी बुद्धिवादी परंपरेला अत्यंत महत्त्व दिले आहे. समाज स्थैर्याचे दृष्टीने आर्थिक समतेच्या दृष्टीने भारताची लोकसंख्या मर्यादित होणे हे अत्यंत महत्त्वाचे अंग आहे. कुटुंबनियोजनाबद्दल लोक तुच्छतेने बोलतात. चेष्टेने बोलतात. पण जे मर्यादित असलेले उत्पन्न हे जर भारतातील प्रत्येकाला मिळावयास पाहिजे, खायला मिळावयास पाहिजे निदान एकदा तरी, आणि हे जर नसेल तर आमच्या संविधानात अर्थ नाही. आम्ही सगळे एक आहोत, समता आहे, प्रत्येकाला जगण्याचा हक्क आहे हे नुसते आम्ही ग्रंथामध्ये ठेवणार आणि आचरणात आणणार नसलो तर संविधानाला अर्थ नाही. संविधान आमच्या जीवनाचा भाग झाला पाहिजे, मानवाला ज्या जीवन

ठेवण्याला आवश्यक गोष्टी त्या उत्पन्न व्हावयास पाहिजे, पण त्याचबरोबर लोकसंख्याही मर्यादित करावयास पाहिजे.

तेव्हा ही आर्थिक समस्या सामाजिक सुधारणेचा भाग आहे आणि दुसरी गोष्ट सांगितली आता जी जीवनमूल्ये आहेत आजच ती बदलली पाहिजेत. काहीतरी एक शास्त्र प्रकारची जीवनमूल्ये असतात त्याच आधारावर मानव जात जगली आहे, तरली आहे ती शाश्वत जीवनमूल्ये आम्ही समाजामध्ये आणली तर आम्ही क्रांती करू ती जर आणली नाहीत तर हानी होणार आहे.

तर बंधूंनो, मला एवढेच सांगावयाचे आहे की आपल्याला ह्या समाजसुधारणेच्या गोष्टी आता राजा राममोहन रॉय, न्यायमूर्ती रानडे, आगरकर किंवा जोतिबा यांच्या मान्य असणाऱ्या समस्यांपेक्षा आता वेगळ्या समस्या निर्माण झालेल्या आहेत आणि या समस्या सोडविताना त्या पूर्व पिढीकडे आपण जरूर पहावे. त्यांनी दाखविलेला मार्ग आपण जरूर चोखाळावा. त्यात ज्योतिबांनी पेटवलेली ज्योत आपल्याला खरोखरच उज्ज्वल असा मार्ग दाखवते आहे. मग गांधीजींनी दाखविलेला मार्ग मात्र आमच्या समाजाला धैर्य आणण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे आणि हा मार्ग हा समाज सुधारणेचा मार्ग आहे. आजच्या समस्या गांधीच्या मार्गाने आपण गेल्यास आर्थिक विषमता पुष्कळ कमी होईल आणि जीवनमूल्ये ही चांगल्या प्रकारची होऊ शकतील पण जर आम्ही या बाबतीत गांधीजींना विसरलो तर इतिहास मात्र आम्हांला क्षमा करणार नाही.

कदाचित मी जे बोलतो आहे हे आपणास अतिरंजित वाटत असेल. पण या विषयावर मी थोडया अधिकाराने बोलू शकतो. या विषयावर मी सारखे चिंतन करीत असतो, विचारविनिमय

करीत असतो. अखेर आपल्या ह्या समाजाचे काय होणार आहे आणि म्हणून मी आपल्यां गावी आलो आणि माझे विचार मी आपणापुढे मांडले. इतिहास आपल्याला क्षमा करणार की नाही याचं उत्तर आम्ही आपले जीवन यापुढे कसे ठेवतो यावर अवलंबून असेल इतके सांगून मी माझं भाषण पुरे करतो.

त्र्यंबक कृष्ण टोपे

प्रा. चिं. शेजवलकर

# ' सद्यःस्थिती '

प्रभाकर चिंतामण शेजवळकर

जन्मस्थळ :- सोनेगांव, जि. वर्धा, (विदर्भ)

जन्मदिनांक :- १५ जानेवारी १९२९

शिक्षण :- एम्. कॉम्. पर्यंतचे मुंबईत, आणि अर्थशास्त्रातील पी एच्. डी. पुणे येथे.

महाविद्यालयीन अध्यापन १९५३ पासून सुरू. १९६१ मध्ये डेक्कन एज्युकेशन सोसायटीमध्ये आजीव सदस्यत्व मिळाले. आणि बृहनमहाराष्ट्र कॉलेजमध्ये उप–प्राचार्य म्हणून काम करण्यास सुरवात.

पुणे विद्यापीठात वाणिज्य शाखेचे डीन. आणि वाणिज्य अभ्यासक्रम मंडळाचे १० वर्षे अध्यक्ष.

गेली पांच वर्षे व्यवस्थापन शिक्षण वर्गांचे संचालक आणि गेल्या-वर्षांपासून नविन काढलेल्या ' इन्स्टिटयूट ऑफ् मॅनेजमेंट डेव्हलपमेंट अँड रिसर्च ' या संस्थेचे प्राचार्य.

उद्योग, व्यापारी, सरकारी आणि बिनसरकारी अशा अनेक संस्थामध्ये पदाधिकारी व सहकारी.

लेखन :- १२ पुस्तके प्रकाशित.

१५ वर्षे पी एच्. डी. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि २१ विद्यार्थ्यांना पी. एच्. डी. ची पदवी मार्गदर्शनाखाली मिळाली.

सध्याची सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थिती ही इतकी गुंतागुंतीची झाली आहे की त्याचा योग्य अन्वयार्थ लावून त्यातून समाज प्रबोधनची नवी दिशा सामान्य माणसासमोर विचारार्थ मांडणे हे अतिशय आवश्यक होऊन बसले आहे गेल्या २५ वर्षांत आपण पुष्कळ मिळविले आणि पुढील कांही वर्षांत आपल्याला नवसमाज निर्माण करायचा आहे. सुदैवाने आपला इतिहासकाळ उज्वल आहे. आपली परंपरा मोठी आहे आपली जागतिक प्रतिष्ठा ही देखील वैभवाच्या शिखरावर आहे, परंतू गेल्या कांही वर्षांत अनेक आर्थिक अडचणीमुळे संत्रस्त झाल्यासारखे दिसत आहोत. आणि या परिस्थितीचा फायदा घेऊन आपल्या एकसंघ राष्ट्राची अस्मिता नाहिशी करावी असे आपल्या देशाच्या हितशत्रूंना वाटत आहे. आणि म्हणूनच सध्या आपण एका मोठ्या कठीण प्रसंगातून जात आहोत. यातून बाहेर पडण्यासाठी सद्यः परिस्थितीचे वस्तुनिष्ठपणे व राजकीय भूमिका बाजूला ठेवून विश्लेषण करणे आवश्यक आहे. डॉ. प्र. चिं. शेजवलकर यांनी आपल्या देशातील सध्याच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय परिस्थितीचे आपल्या व्याख्यानात पृथःकरण केले आहे. आणि सध्याच्या परिस्थितीवर कांही दूरगामी स्वरुपाचे उपाय सुचविले आहेत.

कराड नगरपालिकेचे पदाधिकारी श्री. करंबेळकर, श्री. खंडकर आणि जिज्ञासेने या व्याख्यानासाठी आपण जमलेले पदाधिकारी.

कराड नगरपालिकेतर्फे यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला सुरू झाली व तिचे ३ रे वर्ष आहे. या नगरपालिकेतर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या व्याख्यानमालेमध्ये मला निमंत्रण देण्यात आले आणि एक व्याख्यान पुष्प गुंफण्याची संधी मला मिळाली हे माझे मी भाग्य समजतो. भाग्य समजण्याचे कारण असे की ज्या श्रेष्ठ व लोकप्रिय नेत्याच्या नावे ही व्याख्यानमाला आयोजित केली आहे त्या लोकप्रिय नेत्याबद्दल श्री. यशवंतराव चव्हांण यांच्याबद्दल, व्यक्तिशः मला अतिशय नितांत आदर आहे. त्यांच्याबरोवर बोलण्याची, त्यांच्याबरोबर बसण्याची, त्यांच्या-बरोबर चर्चा करण्याची अनेक वेळा मला संधी प्राप्त झाली आहे. संधी मिळाली आहे. ज्या ज्या वेळेला मी त्यांच्याशी बोललो आहे त्या त्या वेळेला त्यांची सूक्ष्म निरीक्षण पद्धत सगळ्यांशी विचारपूर्वक व संयमाने बोलण्याची वृत्ती आणि विशेष म्हणजे सगळ्यांना आकर्षित करून घेणारे त्यांचे व्यक्ति-मत्त्व यामुळे मी प्रभावित झालो आहे. प्रसंग कोणताही असो त्यांची वृत्ती सतत प्रसन्न असते. लहान मूल असो, मोठा माणूस असो, विरोधक असो, सहकारी असो, ज्या ज्या वेळेला त्यांना जवळून किंवा लांबून पाहण्याचा योग आला आहे. मी ज्या वेळेला त्यांच्या दिल्लीच्या निवासस्थानी गेलो होतो विद्यार्थ्यांना घेऊन गेलो होतो. एकटा गेलो होतो. सहकाऱ्यांना घेऊन गेलो होतो आणि त्या वेळेला वृत्तपत्रांतून त्यांच्याबद्दल आदराने पर-देशामध्ये ज्यांच्याबद्दल बोलले जाते अशी महनीय व्यक्ती आपल्याला जवळून कशी दिसते हे पाहाण्याची मला अनेक वेळेला संधी मिळाली आणि म्हणून मी म्हटले एक मुरब्बी राजकारण-

कुशल, एक मुत्सद्दी, एक विचारवंत म्हणून भारतातल्या सगळ्या नागरिकांना श्री. यशवंतरावांच्याबद्दल आदर वाटतो. हे स्वाभाविक आहे. एक नागरिक म्हणून त्यांच्या सहवासात गेल्यानंतर त्यांच्याविषयी वाटणाऱ्या आकर्षणामध्ये आदरामध्ये भरच पडते. म्हणून तर मला नेहमीच वाटत आले आहे की जे माझे काही मित्र कराडचेच आहेत, त्या सर्वांना नेहमीच या गोष्टींचा खरोखरच मोठा अभिमान वाटत असेल की आपल्यामधला शेतकरी कुटुंबातील एक सामान्य मुलगा, पूर्वी लहान असलेला एक मुलगा पुढे फार मोठा होतो आणि भारतातले राजकारण भारताचे आणि परराष्ट्राचे राजकारणसुद्धा आज मोठ्या भारी दक्षतेने आणि यशस्वीतेने हाताळतो हे कौतुकास्पद आहे. आणि आपल्या गावाचा अभिमान वाटावा असेच फार मोठे कार्य यशवंतरावांनी केले आहे. परवाच त्यांच्या सत्कारानिमित्त ग. दि. माडगूळकरांनी एक अतिशय मार्मिक अशी उपमा वापरली होती की चंद्र हा आकाशामध्ये लांब असतो तो काही आपल्याजवळ नसतो. परंतु चालणाऱ्या माणसाला असे वाटते की चंद्र हा आपल्याबरोबर चालत आहे. अगदी मार्मिक अशी उपमा माडगूळकरांनी वापरली आहे.

यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व इतके लोभस आहे की– त्यांच्याजवळ असणाऱ्यांना आणि त्यांच्याशी विरोध करणारांनासुद्धा मनामध्ये यशवंतरावांबद्दल आकस वाटत नाही. यशवंतराव हे केव्हाच पंतप्रधान होऊ शकले असते आणि होतीलही. परंतु त्यांनी जे उद्‌गार काढले तेही मोठे मार्मिक होते की ह्याच्यापेक्षा अधिक मोठ्या पदाची मला अपेक्षा नाही. मी अतिशय नम्र भावाने या देशाची सेवा करतो आहे आणि याच्यातच त्यांच्या यशाचे रहस्य आहे. खरोखरच अंतःकरणपूर्वक, नम्रतापूर्वक कुठल्याही पदाची अपेक्षा न धरता त्यांनी सतत सेवा केलेली

आहे. आणि म्हणूनच मोठेपण त्यांच्या पायाशी चालत आलेले आहे. माझ्या मनात कित्येक वेळा असे येते की असा एक सुदिन उगवावा की आपले यशवंतराव आपल्या कराडच्या नागरिकांना आपल्या देशाचे पंतप्रधान म्हणून पाहायला मिळतील. अशा या ज्येष्ठ नेत्याशी संबंधित अशा या व्याख्यानमालेमध्ये व्याख्यान देण्याची संधी मला मिळाली त्या वेळेला मी अतिशय नम्र भावनेने त्यांच्याविषयी वाटणाऱ्या आदराने मी या ठिकाणी आलेलो आहे. मला जे दुसरे कारण या ठिकाणी यायला आनंद-दायक वाटते ते हे की या गावामध्ये गेली ३ वर्षे आणि त्याही पूर्वी अन्य व्यासपीठावरून या नगरपालिकेतर्फे आणि इतर संस्थातर्फे एक प्रकारचे आपण ज्ञानपीठ आपण उघडले आहे. आणि अनेक तज्ञांची व्याख्याने होत आलेली आहेत. आणि कराड-मधील नागरिक लोक अशा या व्याख्यानांना उत्तम प्रकारचा प्रतिसाद देत आलेले आहेत. दूरदूरच्या गावी गेल्यानंतर पुण्यामुंबईकडल्या आमच्यासारख्या शिक्षकांना हा अनुभव येतो की अतिशय जिज्ञासेने हे त्या विषयावरील प्रेम ज्ञानावरचे प्रेम ठेवून हे नागरिक लोक अगदी विद्यार्थ्यांची भूमिका ठेवून व्याख्यानांना येत असतात आणि म्हणून आमचे असे कर्तव्य आहे की तितक्याच श्रद्धेने आणि तितक्याच अभ्यासू वृत्तीने जे काही आपल्याजवळचे विचारधन असेल ते आपण इतरांना वाटण्याचा प्रयत्न करावा.

मला दिलेला विषय म्हटला तर अतिशय साधा आणि सरळ आहे. तर कुठल्याही सामान्य माणसाच्या मनामध्ये सतत सद्यःस्थितीविषयी विचार चालू असतात. सद्यःस्थितीमध्ये प्रत्येकाच्या मनात येणारे विचार हे अर्थात वेगवेगळे असतात. कारण सध्याची स्थिती अशी आहे हे प्रत्येकजण स्वतःच्या चष्म्यातून पाहात असतो. त्यामुळे म्हटले तर हा विषय कठीणही आहे. सद्यःस्थिती-

वर बोलायचे झाल्यानंतर त्यामध्ये आर्थिक प्रश्न आले सामाजिक आणि शैक्षणिक प्रश्न आले. सध्याच्या स्थितीमध्ये आपण मार्ग कसा काढू शकू, आपण अडचणीत आहोत का या विषयीही मतभेद असू शकतील. कारण हा विषयच असा आहे की जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करून जाणारा. प्रत्येकाचा दृष्टिकोन वेगळा असेल आणि प्रत्येकाची वृत्ती वेगळी असेल. म्हणून सद्यःस्थितीवर बोलतांना एक मर्यादा मनामध्ये ठेवलेलीच आहे. मला जे जे वाटते ते एक नागरिक म्हणून वाटते, विद्यार्थी म्हणून वाटते, शिक्षक म्हणून वाटते ते ते सर्वसाधारणतः सर्वांना तसेच वाटत असावे. अनुभव हे सारखेच असतात. अर्थात काही मतभेद होऊ शकतात. सद्यःस्थितीबद्दल काहींना निराशा वाटते आणि सद्यःस्थितीबद्दल आशा बाळगून असणारे लोकही खूप असतात. काही आशावादी, कष्ट करणारे, धडपडणारे लोक असे म्हणतात की आजची परिस्थिती जरी तुम्हाला निराशाजनक दिसत असली तरीसुद्धा मागे वळून पहा. पाच पन्नास वर्षांपूर्वी होतो त्यापेक्षा आम्ही पुढे आलो आहोत. आणि याहीपेक्षा अधिक पुढे जाण्याची आम्हाला धडपड करायची आहे. या विषयाचे प्रतिपादन म्हणून ज्या दृष्टिकोनातून करावं त्या दृष्टिकोनातून करता येईल. इथं समजा परिसंवाद ठेवला असता आणि मला अशी बाजू घेऊन बोलायला सांगितले असते की– सद्यःस्थिती चांगली आहे असे प्रतिपादन तुम्ही करा तर ती तितक्याच आग्रहाने व आवर्जून मी ती करू शकलो असतो आणि करता येईल. सद्यःस्थिती वाईट आहे, पूर्वीपेक्षा अधिक वाईट झाली आहे, तुलनात्मकदृष्टया ती वाईट आहे, जगातल्या इतर देशांच्या मानाने ती वाईट आहे अशा रीतीने प्रतिपादन करता येण्यासारखे आहे. चांगली आहे असेही करता येईल. पण म्हणूनच अमूक एक आग्रही भूमिका घेण्यासाठी हे विचारप्रदर्शन नाही. हे जे व्यासपीठ आहे त्या व्यासपीठावरून एखाद्या प्रश्नाकडे सर्व बाजूंनी

आपण बघावे, सर्वस्पर्शी ज्ञान आपण मिळवावे आणि त्यातून ज्याला जो बोध घ्यायचा आहे तो त्याने घ्यावा असेच ह्या व्यासपीठाचे उद्दिष्ट आहे आणि म्हणून अमूक एक आग्रही भूमिका मी मांडणार नाही. सद्यःस्थिती हा विषयही असा आहे की दोरीवरून चालणाऱ्या माणसाला जसे कठीण जाते तसेच प्रत्येक वक्त्याचेही व्हावे. वक्त्यालाही काही भूमिका असू शकतात. पण मी मात्र कुठल्याही तऱ्हेची भूमिका या ठिकाणी घेणार नाही मी जिज्ञासूचीच भूमिका या ठिकाणी घेणार आहे. आणि ज्याला अभ्यासूची म्हणतात ती घेणार आहे. आणि त्यामुळे अमूक एक आग्रही प्रतिपादन केले पाहिजे, करता येईल असे मनात असूनही मी ते योग्य मानीत नाही. जितक्या बाजू आपल्याला बघता येतील तितक्या आपल्याला बघायच्या आहेत. आता असं करतांना अमूक बाजू आपल्याला वगळून चालेल असे म्हणून चालणार नाही. आर्थिक विषयावर प्रतिपादन करताना त्याचा स्पर्श राजकीय क्षेत्राशी येतोच. आणि राजकीय आणि आर्थिक क्षेत्राचा विचार करताना आपली सामाजिक प्रगती किंवा परिस्थिती ही आपल्याला दुर्लक्षून चालणार नाही. किंबहुना सामाजिक, राजकीय, शैक्षणिक ही सर्वच क्षेत्रे अशी आहेत की एका क्षेत्रातील परिणाम दुसऱ्या क्षेत्रावर होतो. आणि म्हणूनच या देशाविषयी प्रेम आणि आशा बाळगणाऱ्या सर्वांना, आपल्याला असे वाटते की सद्यःस्थिती कशी आहे याचे मूल्यमापन कोणी कसंही करोत या सद्यःस्थितीतून बाहेर येण्यासाठी धडपड करण्याची जिद्द सतत आमच्यामध्यें राहू दे, आत्मीयता राहू दे आणि एक दिवस आम्हाला असा भाग्यशाली दिसू दे की ज्या वेळेला याहीपेक्षा अधिक चांगल्या स्थितीत आम्ही असू. सद्यःस्थितीपेक्षा अधिक चांगली स्थिती आम्हाला प्राप्त होवो असे अमेरिकेतील धनाढ्य व सुखी लोकसुद्धा म्हणतात.

सद्य:स्थितीविषयाचे मुल्यमापन तरी कसे करायचे याच्या काही कसोटचा तरी आहेत का, सद्य:स्थिती चांगली आहे की वाईट आहे हे ठरविण्याच्या कसोटीचे काही एक गमक पाहिजे, कारण अमेरिकेतील कित्येक लोक आज वैभवामध्ये लोळताहेत आणि तरी देखील ते आज दु:खामध्ये आहेत. तिथले आर्थिक जीवन समृद्ध आहे, दर दोन माणसांमागे एक मोटारगाडी आहे. टेलिव्हिजन आहे आणि तिथला शेतकरी हेलिकॉप्टरने आपल्या शेतामध्ये जातो अशी वर्णने आपण ऐकतो, जपानसारखा दोन्ही युद्धामध्ये होरपळून निघालेला देश अवघ्या १० । १५ वर्षांच्या आत अमेरिकेच्या मांडीला मांडी लावून बसतो आणि जपान देशामध्ये प्रत्येक शहरामध्ये इतके टेलीफोन आहेत की सध्या भारतामध्ये जितकी टेलिफोनची संख्या आहे त्याच्या दीडपट इतके टेलिफोन एकेका शहरामध्ये तेथे आहेत. समृद्धीचे हे सगळे वैभव आपण पहायला लागलो म्हणजे आपण थक्क होऊन जातो. सबंध जगाची स्थूलमानाने जर वर्गवारी केली तर अतिशय समृद्ध देश मध्यम वर्गातील देश आणि मागासलेला देश असे तीन गट पडतात आपण अतिशय मागासलेल्या वर्गामध्ये आहोत यात काही शंका नाही. पण जे समृद्ध देश आहेत ते देश सुखी आहेत असे नव्हे. त्या देशामध्ये नवे प्रश्न निर्माण झाले आहेत. औद्योगिक क्रांतीचा दुसरा टप्पा त्यांनी ओलांडला ही गोष्ट खरी आहे. आपण अजून शेणाच्या आणि मेणाच्या क्रांतीमध्ये आहोत. पोलादाची क्रांती, कोळशाची क्रांती, विजेची क्रांती, अशा अनेक प्रकारच्या क्रांत्या आपल्याला एकामागून एक पचवायच्या आहेत. पचवायची जिद्द आपण बाळगली होती. कारण आपण असे ठरवलं होत की ज्या वेळेला आपण स्वतंत्र झालो त्या वेळेला आम्ही शेणा-मेणाच्या क्रांतीतील लोक जरी असलो, जरी आमचा देश खंडप्राय असला, अठरापगड जातीचा असला अनेक धर्म अनेक भाषा असल्या तरीसुद्धा हा देश आम्ही एकसंघ ठेवू. या देशामध्ये

लोकशाही ठेवू आणि आर्थिक पायाही मजबूत करू. जे लोक आपल्या देशाची अमेरिकेशी तुलना करतात ते लोक हे विसरतात की अमेरिका काय, जर्मनी काय, जपान काय किंवा ग्रेट ब्रिटन काय ह्या देश।मध्ये गेल्या १०० वर्षांमध्ये हळूहळू औद्योगिक क्रांती होत गेलेली आहे. आणि आपण इतके मागासलेले असताना आपण सगळ्या औद्योगिक क्रांत्या एका पिढीत आपल्याला साध्य करायच्या आहेत या सगळ्या पाश्चात देशामध्ये व्यापारी क्रांती अगोदर झाली होतो. आणि पैसा उपलब्ध होता. सोन्याची चण-चण नव्हती. या पाश्चात्य देशामध्ये जी औद्योगिक क्रांती झाली आणि जे लोक वैभवामध्ये लोळत आहेत या सगळ्या देशांमध्ये धर्माचा किंवा जातीचा किंवा भाषेचा प्रश्न निर्माण झालेला नाही राष्ट्राचे तुकडे होण्याचे भय कधी या देशात निर्माण झाले नाहीं. राष्ट्रीय प्रश्न कधी फारसे निर्माण झाले नाहीत. आणि म्हणून आर्थिक समृद्धी आणि वैभव हळूहळू ते मिळवत गेले. आणि आपल्याकडील परिस्थिती आपण जाणून घ्यायला पाहिजे. मुळा-मध्ये आपले राष्ट्र हे राष्ट्र होते किंवा नाही हा प्रश्न आपण स्वतःला कितीतरी वेळा विचारला आहे. ब्रिटिशांच्या १५० वर्षांच्या कारकिर्दीमुळे राजवटीमुळे आपली एकराष्ट्रीयत्वाची अस्मिता अधिक जागृत झाली आणि आपण एकसंघ राष्ट्र झालो. आणि हा विशाल महाभारत निर्माण झाला. पण त्याबरोबरच अनेक समस्याही ब्रिटिशांनी आपल्यापुढे ठेवून दिल्या. धर्मांधता आहे. जातीयता आहे. स्पृशास्पृश्यता आहे. सामाजिक मागासले-पणा आहे. अंधश्रद्धा आहे. अनेक प्रकारच्या सामाजिक राष्ट्रीय समस्या तर आहेतच परंतु आर्थिक दुर्भिक्षताही आहे. किती लोक गरीब आहेत आपल्या देशामध्ये आपण 'गरिबी हटाव' हे ध्येय ठेवले आहे पण गरीब कोणकोण व किती असावेत? आज १९७५ मध्ये, ह्या देशामध्ये ४० टक्के लोक दारिद्रय रेषेच्या खाली आहेत. २४ कोटी लोक भारतामध्ये अजून असे आहेत की

ज्यांना दोन वेळेला पुरेसे जेवायला मिळत नाही. ज्यांना दररोज ५० पैशांपेक्षा जास्त पैसे खर्च करता येत नाहीत. म्हणजे आजच्या किंमतीच्या मानाने ! असेही लोक आपल्या देशामध्ये आज ६० टक्के आहेत. म्हणजे भयानक दारिद्रय आहे. दारिद्रयही आहे आणि विषमताही आहे. आणि दुसऱ्या टोकाला इन्कम टॅक्स भरणारे लोक फक्त एक टक्का या देशामध्ये आहेत. अशा या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक तिन्ही क्षेत्रांमध्ये अनेक समस्या बरोबर घेऊन जन्माला आलेला आपला देश अवघ्या २५ वर्षांमध्ये एकदम पाश्चात्य देशांची बरोबरी करू शकेल अशी अपेक्षा करणे मला थोडसं गैर वाटते. परिस्थिती चांगली आहे असं प्रतिपादन करण्याचा आग्रह नाही. मी सुरवातीलाच आपल्याला सांगितले को आपल्याला सर्व कंगोरे बघायचे आहेत. पण ते बघताना आपली दृष्टी समतोल हवीं आहे, एक समाज शास्त्राचा विचार करून मी ज्या वेळेला मूल्यमापनाच्या कसोटचा लावून मी माझ्या देशाची प्रगती काय आहे आणि आज माझ्या देशाच्या समस्या काय आहेत असं जेव्हा बघतो तेव्हा मला आजपर्यंतच्या प्रगतीचे खूप उत्साहवर्धक चित्र दिसते. १९४७ साली मोठमोठ्या पाश्चात्य आणि पौर्वात्य साम्यवादी देशातील तत्त्वज्ञान्यांनी असं भाकित केलं होतं की भारताचे पाच दहा वर्षात अनेक तुकडे होतील. भारत सर्वंकष असा राहूच शकणार नाही. भारतामध्ये लोकशाही नांदेल असे कधीही कोणाला वाटले नाही. ज्या वेळेला आपल्याला स्वातंत्र्य मिळाले त्या वेळेला परदेशातील अनेक राजकीय पंडितांनी भारताबद्दल असे निराशाजनक भाकीत केले. त्यांना असे भय वाटले की भारत एकसंघ राहू शकेल कां ? भारतामध्ये लोकशाही टिकेल का ? आणि या दोन्ही प्रश्नावर अनेक पंडितांची भविष्ये चुकलेली आहेत. मला असं वाटतं की सद्यःस्थिती फारच चांगली आहे असे सत्तारूढ पक्षाचे लोकही म्हणत नाहीत, विचारवंतही म्हणत नाहीत सद्यः

स्थितीमध्ये फार अडचणी आहेत. पण आपल्या पाठीमागची जो ऐतिहासिक पार्श्वभूमि आहे ती आपण विचारात घ्यायला पाहिजे. आणि मला असे वाटले की ती जर विचारात घेतली तर आपल्याला असे दिसेल की वास्तविक पहाता संकटाचे अनेक डोंगर आपल्याला ओलांडावे लागले. अनेक प्रकारच्या अडचणी आल्या. आणि आपल्या राष्ट्राच्या आयुष्यात कित्येक वेळेला असे प्रसंग आले की ज्या वेळेला राष्ट्र निरनिराळ्या तऱ्हेला बळीपडले असते. आपले राष्ट्र सुरुवातीला अमेरिकेच्या कच्छपी लागलं असतं तरी आपण त्यात बळी पडलो असतो. संपूर्णतः साम्यवादी देशाच्या अंकित झालो असतो. तरीदेखील आपल्या राष्ट्रामध्ये लोकशाही टिकली नसती. कुठल्याही राष्ट्राशी आपण तुलना करून पहा. चीनमध्ये फार मोठी क्रांती झाली असे आपण मान्य करतो. ज्या वेळेला आपल्याला स्वातंत्र्य मिळाले त्याच वेळेला चीनमध्ये कम्युनिझम आला आणि असं सांगितलं जातं की चीन-मध्ये आर्थिक क्रांती झालेली आहे. खरी माहिती संपूर्ण बाहेर येत नाही. पण चीनमध्ये आर्थिक क्रांती झाली हे क्षणभर मान्य करू, परंतु विचार स्वातंत्र्य, उच्चार स्वातंत्र्य, आचार स्वातंत्र्य, मुद्रण स्वातंत्र्य, शिक्षण स्वातंत्र्य अशा अनेक आघाड्यांवर आम्ही स्वातंत्र्य जपलेले आहे. विरोधकांना स्वातंत्र्य दिलेले आहे, टीकाकारांना दिलेले आहे. कोणीही यावे, कोणीही बोलावे, काहीही छापावे हे स्वातंत्र्य आबाधित ठेवून आम्ही आमचे राष्ट्र एकसंघ ठेवलं आहे. हे स्वातंत्र्य चीनला मिळालेलं नाही. एका बाजूला अमेरिकेला लोकशाही आहे त्याच्या खालोखाल सर्वात मोठी लोकशाही ह्या देशामध्ये आहे हे विसरून चालणार नाही. मला हे मान्य आहे की २५ वर्षांमध्ये आपण काही स्वप्ने बाळगून राष्ट्राची वाटचाल सुरू केली आहे. एकप्रकारे सुंदर आर्थिक वैभवाची स्वप्ने आपण जवळ बाळगली होती. पण आपल्या आर्थिक अडचणीचे मोजमाप आपल्याला नीट करता

आलेले नाही. राष्ट्राच्या जीवनात किती अडचणी येऊ शकतात याची कल्पना आपल्याला आली नाही. आपली जिद्द पुष्कळ होती व आहे पण आपली ताकद आपण पुरेशी पणाला लावली नाहीं आणि म्हणूनच आपण आज इंग्रजीमध्ये ज्याला Cross-road म्हणतात अशा एका चौकामध्ये उभे राहिलो आहोत. आपल्याला कळेनासे झाले आहे की कोणत्या रस्त्याने आपण जावे. पण एक मात्र खरे की काही रस्त्याने जाऊ नये हे आपण निश्चित केले आहे. आपल्या देशामध्ये सुशिक्षीत किंवा साक्षर लोक फार आहेत अशातला भाग नाही. पण तरी कांही रस्त्याने आपण जाऊ नये असे निश्चितच आपल्या देशातील नागरिकांना वाटत आले आहे. ज्या रस्त्याने गेलो तर हुकुमशाही येईल, लष्करशाही येईल, विचारस्वातंत्र्याला बाधा येईल आचार-स्वातंत्र्याला बाधा येईल हे आमच्याकडील निराधार असलेल्या नागरिकांनीदेखील दाखवून दिले आहे. मला वाटते हे सुद्धा आपले मोठे वैभव आहे की आम्ही कोणाच्या आहारी गेलो नाही. कोणाचं अंधानुकरण केलं नाही अमुक एक राष्ट्र पुढे गेले आहे त्यांनी आपण दिपून गेलो आहे असे झाले नाही. आम्ही कोणाचा द्वेषही केलेला नाही. अंधानुकरण रशियाचेही केले नाही आणि अमेरिकेचेही नाही. कारण आम्हाला हे समजून चुकले आहे की जरी तेथे आर्थिक समृद्धी असली तरी तेथे अनंत असे सामाजिक प्रश्न उपस्थित झाले आहेत. की ज्यामुळे तिथली कुटुंबे सुखी नाहीत. तेथील लोक सुखो नाहीत. अर्थात ते सुखी आहेत किंवा नाही याची तुलना किंवा शहानिशा आपल्याला करीत बसायचे नाही. आपण आज कुठे उभे आहोत आणि आपल्याला कोणत्या मार्गाने जाणे शक्य आहे. आपले भवितव्य काय आहे याचे आपल्या मनामध्ये नानातऱ्हेचे विचारतरंग उठत असतात. प्रत्येकाचे विचार वेगळे असतात. प्रत्येकाच्या व्यथा वेगळ्या असतात.

ज्या वेळेला मी या सद्य: परिस्थितीचा विचार करतो त्या वेळेला मला असे दिसते कीं, सध्याची कठीण आर्थिक परिस्थिती हे आपल्या पुढील मोठे आव्हान आहे त्यामध्ये दुमत नाही राज्यकर्ते कांही असं म्हणत नाही की आजची आर्थिक स्थिती चांगली आहे. आजच्या कठीण स्थितीला आपली आर्थिक दुर्भिक्षता व आर्थिक दारिद्र्य हे कारणीभूत आहे. राजकीय कारणे असतीलही सामाजिक कारणे असतीलही परंतु आर्थिक दारिद्र्याची रेषा आपण ओलांडू शकलो नाही. आपण दारिद्र्य रेषेच्या वर येण्यासाठी जुन्या आर्थिक संस्था नष्ट करण्याचा चांगला प्रयत्न केला. नव्या आर्थिक संस्था निर्माण केल्या. आर्थिक नियोजनात आपणास अनंत अडचणी आल्या २० वर्षामध्ये आपण फाटलेल्या किंवा जीर्ण होत जाणाऱ्या कापडाला ठिगळं लावावीत तशी ठिगळं लावून आपण आपले आर्थिक नियोजन केले हे फक्त कागदावरच नियोजन राहीलं आहे. पण त्याही बरोबर हे ही लक्षात घ्यायला पाहिजे की ब्रिटीशांनी ज्या वेळेला आम्हाला स्वतंत्र केलं त्या वेळेला आमच्या हातामध्ये विकासाची उत्पादनाची व्यापाराची कांही साधनं नव्हती. भांडवल निर्मिती नव्हती. आज १९७५ मध्ये ४० टक्के लोक दरिद्री आहेत पण ४७ साली याहीपेक्षा वाईट स्थिती होती. आणि म्हणूनच आम्ही नियोजन करायच ठरवल. ह्या आर्थिक नियोजना करता आम्हाला असे दिसून आले की अनेक प्रकारच्या नव्या आर्थिक संस्थाच निर्माण करायला पाहिजेत. आणि त्यासाठी आम्ही सहकारी चळवळीला पाठिंबा दिला. सामुदायिक विकास योजना काढल्या. नव्या कर्ज संस्था काढल्या. अनेक प्रयोग केले हे प्रयोग यशस्वी झाले नाहीत याची मिमांसा सामाजिक संदर्भात मला करायची आहे. या नव्या संस्था यशस्वी कां झाल्या नाहीत तर नव्या संस्थामध्ये दोष निर्माण झाले. कित्येक संस्था किडल्या. या नव्या संस्थांच हसं झालं, त्यांचे कारण आपण संस्था उभ्या केल्या पण

संस्था चालविणारी माणसें उभी केली नाहीत. कुठल्या ही संस्था पडद्यामागे निष्ठेने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांशिवाय चालत नाही हे आपण लक्षात घ्याव. दुसरे आपण लक्षात घ्यायला पाहिजे की संस्थेची चौकट निर्माण करून भागत नाही. ही संस्था ज्या पायावर उभी आहे तो पाया भक्कम असायला पाहिजे. शून्या–पासून ब्रम्ह आपल्याला निर्माण करायचं, आपल्याला ब्रिटीशा-कडून जे मिळालं ते माळरान मिळालं होते. आणि आपण जिद्द बाळगली होती. महत्वाकांक्षा बाळगली होती, की आपल्याला एक मंदीर एका पिढीत उभे करायचे आहे. मोठी धाव घ्यायची होती ती धाव घेण्याची ताकद आमच्या सर्वांच्यामध्ये नव्हती. आणि म्हणून आम्ही या संस्थांचा वापर नीट केला नाही. नव्या संस्था निर्माण केल्या हे श्रेय मात्र आपण विसरता कामा नये. कित्येक मागासलेल्या पण आपल्याच बरोबरीने स्वतंत्र झालेल्या देशामध्ये नियोजन सुरूही झालेले नाही. या मागासलेल्या देशा-मध्ये कित्येक प्रकारच्या नव्या चौकटी आणलेल्या नाहीत. मला असं वाटतं की जमेची बाजू ही आपण लक्षात घ्यायला पाहिजे, पण त्याच बरोबर या नव्या संस्था निर्माण झाल्या खऱ्या पण या संस्था चालवण्याकरता आपल्याला आर्थिक निधी लागतो, पैसा लागतो, भांडवल लागते हेही लक्षात घ्यावयास पाहिजे.

ज्या योजना आम्ही सगळ्या साकार करणार आहोत त्याकरता लागणारी मदत संचयरूपाने, कर्जरूपाने लोक आम्हाला देऊ शकतील. उरलेली मदत परदेशातील समृद्ध लोक आम्हाला देतील ही आमची आशा संपली. या सगळ्या पुढारलेल्या देशांनी समृद्ध देशांनी आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाचा एक टक्का भाग जरी दिला तरीसुद्धा सगळे मागासलेले देश पुढच्या २५ वर्षामध्ये त्यांच्या बरोबरीने जाऊ शकतील. मात्र त्यांनी एक टक्का आपल्या राष्ट्रीय उत्पन्नातील द्यायला पाहिजे. तो द्यायलासुद्धा त्यांनी

तयारी दर्शविली नाही. त्यांनी शस्त्र पुरवठा केला इतर पुरवठा केला पण त्यांनी अनेक प्रकारच्या राष्ट्रीय आणि आर्थिक अटी त्यांनी घातल्या. त्यामुळे आपल्या देशाला कोटयावधी डॉलर्स अमेरिकेकडून किंवा रशियाकडून मिळाले असले तरी ही मिळालेली मदत विनापाश अशी नव्हती. अनेक प्रकारची बंधने होती. आणि शिवाय ती मदत आपण दुर्दैवाने नीट वापरू शकलो नाही. आणि त्यामुळे आर्थिक घडी आपल्याला नीट उभी करता आली नाही. ज्याला आपण आर्थिक दुष्ट चक्र म्हणतो त्या आर्थिक दुष्ट चक्रामध्ये आपण सापडलो असून त्यातून बाहेर अजून आपल्याला येता आले नाही. हे आर्थिक दुष्ट चक्र कसे मोडायचे ? आपल्याला शून्यातून ब्रम्ह निर्माण करायचे होते आपल्यामध्ये सहा लाख खेडयातून विखुरलेले ८५ टक्के लोक निरक्षर आहेत. अडाणी आहेत अंधश्रद्धाळू आहेत. त्याना मार्गदर्शन अजून होत नाही. दरिद्री असल्यामुळे संचय वृत्ती होत नाही. आणि त्यामुळे भांडवल निर्मिती होत नाही. कोणताही उद्योगधंदा निर्माण करायचा, बेकार लोकांना रोजगार द्यायचा किंवा शेतीमध्ये विकास करायचा असा कुठलाही प्रश्न घ्या त्या करता आर्थिक निधी लागतो. हा आर्थिक निधी उभा करण्याचे आमचे सगळे अंदाज फसले. त्यांच्या अपेक्षा, त्यांच्या बरोबरीला आपण येऊ शकलो नाही. आणि त्यामुळे औद्योगिक उत्पादनामध्ये आणि राष्ट्रीय उत्पादनामध्ये ज्या किमान आमच्या अपेक्षा होत्या त्या अपेक्षा पुऱ्या झाल्या नाहीत. सबंध आर्थिक समालोचन मी करणार नाही. परंतु सद्य:स्थितीला जे महत्वाचे घटक कारणीभूत आहेत त्यामध्ये आमची कमालीची आर्थिक दुर्भिक्षता ही कशी कारणीभूत आहे हे मला मुद्दाम आग्रहपूर्वक सांगावेसे वाटते. आपण २० वर्षे नियोजन केले. हे नियोजन ठिगळ लावण्यासारखं होतं हे मी का म्हणतो तर काही किमान अपेक्षा धरून आमची आर्थिक वाढ होईल. दरवर्षी अमुक इतकी होईल

पण ती तशी काही झाली नाही. आमच्या आर्थिक विकासामध्ये ५ टक्के वाढ होईल अशी अपेक्षा आम्ही नेहमी धरत आलो. ती किमान होती. ही पांच टक्के वाढ झाली म्हणजे आमच्या सगळ्या जनतेला दारिद्र्य रेषेच्या वर आणता येईल असेही नाही. कदाचित आपल्याला यासाठी १०० वर्षे लागतील. पण ही ५ टक्के वाढ सुद्धा आमची होऊ शकली नाही. तर निदान पहिल्या १० वर्षामध्ये ३ टक्के वाढ आणि दुसऱ्या दहा वर्षामध्ये २॥। टक्के वाढ इतकीच झाली. आपण असं गृहित धरू या की दरवर्षी ३ टक्क्यांनी वाढ होते आहे पण त्याबरोबरच लोकसंख्या २॥ टक्क्यांनी वाढत आहे. म्हणजे निव्वळ अशी झालेली आर्थिक वाढ ही अर्धा टक्कासुद्धा नाही. अतिशय जर्जर आणि क्षीण झालेल्या देशामध्ये अर्धा टक्का वाढ दरवर्षी होणार असेल तर साहाजिकच आपल्याला अनंत काळ या दारिद्र्यामधून बाहेर येण्यासाठी आपल्याला वाट पहावी लागेल.

आर्थिक दारिद्र्यातून वर येण्याकरता अनेक प्रकारची पथ्ये आपल्याला पाळावी लागतात. ही पथ्ये आपण पाळू शकलो नाही. आपले आपणच याला अंशतःतरी जबाबदार आहोत. परदेशातले लोकही याला जबाबदार आहेत, त्यांनी आपले राजकारण चालवले, आपल्या शत्रूलाही मदत केली. परकीय अतिक्रमणें आली आणि त्यामुळे आपल्या योजनामध्ये खंड पडला. पाकिस्तानशी तीनवेळा युद्ध झाले. चीनचा धोका आहेच. त्यामूळे आपल्या संरक्षणावरचा खर्चही वाढत गेलेला आहे. एकच लक्षात घ्या की आपण सबंध पाचव्या पंचवार्षिक योजनेमध्ये जे ३७ हजार कोटी रुपये आपण गुंतवणार आहोत हा खर्च अमेरिकेमधील लष्कराचा केवळ एक आठवड्याचा असूशकतो. इतके अंतर त्या देशातील आणि आपल्या देशातील आर्थिक परिस्थितीमध्ये आहे. आणि त्यामध्ये शिवाय इतर अडचणी आहेत जनतेने अमुक एक त्याग केला,

इतकी बचत केली, इतकी भाडवल निर्मीती केली, अमूक एक शिस्त पाळली तर ३७ हजार कोटी रुपयांची पांचवी योजना पार पाडता येणार आहे. त्यामुळे ती यशस्वी होणार किंवा नाही याला मी महत्व देत नाही. कारण आपण अशा स्थितीत पोचलो आहोत. आपण इतके मरगळलेले झालो आहोत व आम्हाला नराशाने इतके घेरलेले आहे की कित्येक लोक असे म्हणतात की आम्हाला प्रथम आर्थिकदृष्टया दारिद्रयाच्या रेषेच्यावर ताबडतोब यायला पाहिजे. अंधारात चाचपडाव किंवा अंधारामध्ये भितीवरच आपल डोक आपटत रहावं अशी आपली सर्वांची, स्थिती झाली आहे. सरकारची झाली आहे. तशीच विरोधी पक्षाची झाली आहे. जे लोक अस म्हणतात की आज या देशामध्ये सत्तारूढ पक्षामुळेच केवळ लाचलुचपत निर्माण झाली आहे भ्रष्टाचार निर्माण झाला आहे आणि त्याचा नाश करण्यासाठी आम्हाला सत्ता हवी आहे त्याच्याही जवळ विकासाचा स्पष्ट दिसणारा आर्थिक कार्यक्रम नाही. हे अशाकरता मी सांगतोय की भितीवर अंधारामध्ये सगळेच लोक डोके आपटीत आहेत. कोणाला मार्ग सापडलेला आहे असे नाही. फक्त चिडल्यामुळे, नैराश्यामुळे, मरगळल्यामुळे आम्हाला असं वाटतं की सत्तांतर करून पाहू या. इतकी वर्षे एकाच पक्षाने सत्ता भोगली आता दुसऱ्याच्या हातात सत्ता दिली तर काही बदल होतो का काय पाहू या. ज्याला पाहायचे असेल त्यांनी जरूर पहावं कारण आपल्याकडे अजून लोकशाही आहे. मत स्वातंत्र्य आहे. परंतु या प्रयोगामुळे, सत्ता बदलल्यामुळे परिस्थितीमध्ये फरक पडणार आहे असं नाही. ज्या स्थितीला आपण येऊन पोचलो आहो, ज्या स्थितीला सर्वसामान्य जनता मग ती कुठल्याही राजकीय पक्षाची असो, विटली आहे. सर्वसामान्य जनता प्रथम राजकीय दृष्टया विचार करीत नाही, आर्थिक दृष्टया करते. सर्वसामान्य जनतेच्या मर्यादा, राष्ट्राच्या काही स्वाभाविक मर्यादा, काही

कारणामुळे निर्माण झालेले आजचे आंतरराष्ट्रीय राजकारण, आंतरराष्ट्रीय वातावरण अशा अनेक गोष्टीमुळे आज आपण थोडयाशा मरगळलेल्या परिस्थितीला आलेलो आहोत. आणि म्हणूनच सद्य:स्थितीतून मार्ग काढावयाचा असेल, स्वावलंबी बनावयाचे असेल, प्रत्येक योजनेमध्ये स्वावलंबी होणार आहोत असं उद्दीष्ट आपण लिहिलेलं आहे. पण खऱ्या अर्थाने स्वावलंबी आपल्याला व्हायचं असेल, तर एकदम दोन आघाडयावर आपल्याला लढावं लागेल. पहिली आघाडी ही की जे गरीब आहेत त्यांना दारिद्रय रेषेच्या वर जावयास पाहिजे उत्पादनात वाढ न्यावयास पाहिजे. उत्पादन वाढ मग ती कोणीही करो आर्थिक क्षेत्रातील लोकांनी करो, सहकारी क्षेत्रातील लोकांनी करो, सार्वजनिक क्षेत्रातील लोकांनी करो, शेतकऱ्यांनी करो, बागायतदारांनी करो, कोणीही करो,, इथं राजकीय तत्त्वज्ञान नको, उत्पादनात वाढ, उत्पादनाच्या क्षमतेत वाढ, ही आम्हाला हवी ती आम्ही केलेली नाही. चीनमध्ये ती तशी झालेली आहे. चीनमध्ये प्रत्येक खेडयामध्ये आज पोलादाच्या भट्टया निघाल्या आहेत. आणि आमच्याकडे दुर्गापूर, राउरकेला, बोकारो, भिलई अशा ३।४ ठिकाणी पोलादाच्या भट्टया निघाल्या की आम्हाला खूप केल्यासारखे वाटते.

जे निर्माण झाले आहे ते कमी असले तरी जे आहे त्याचा वापर आम्ही नीट करत नाही. या चीनचे उदाहरण सांगावयाचे झाले तर तेथे सिमेंटचा तुटवडा आहे. म्हणून अजूनही नवचीनमध्ये घराला सिमेंट वापरू देत नाहीत. असं माझ्या वाचण्यात आलं आहे. घराला अजून चुनाच वापरला जातो. सिमेंट जर वापरायचे असेल तर त्याचा अग्रक्रम ठरलेला आहे. हे अग्रक्रम आपण पाळत नाही. मुंबईमध्ये आज गगनचुंबी इमारती उभारल्या जात आहेत. थिएटर्स उभी रहात आहेत. तिथे सिमेंट वापरलं जात आहे.

म्हणजे ही आघाडी दोन प्रकारची आहे. आम्ही सगळे दुर्भिक्षित आहोत. दरिद्री आहोत. सगळ्याना दारिद्रयाच्या रेषेच्या वर यायला पाहिजे त्या करता उत्पादनात वाढ व्हायला पाहिजे पण निर्माण झालेले उत्पादन एका विशिष्ट अग्रक्रमाने वापरायला पाहिजे. मग ते खाद्य पदार्थ असो, सिमेंट असो पोलाद असो आणि दुसऱ्या बाजूला जे समृद्धीच्या शिखरावर केवळ बडे लोक आहेत अशा लोकांना त्याग करायला लावला पाहिजे प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. वि. म. दांडेकर आणि श्री. पालखीवाला हे जे आजचे अर्थशास्त्र मांडतात ते लक्षात घ्या व या दोघांचेही या बाबतीत एकमत आहे की आर्थिक विषमता जर नष्ट करायची असेल तर वरच्या २० किंवा ३० टक्के लोकांचे उत्पन्न आजच्या २० टक्के लोकांना दिले तरी आर्थिक समतोल निर्माण होऊ शकेल. या बाबतीत आम्ही विशेष असे काही करू शकलो नाही. २० वर्षांमध्ये नियोजन खऱ्या अर्थाने झाले नाही. मी हे या करता म्हणतो की त्या करता लागणारी आर्थिक त्यागाची तळमळ ज्या वर्गाने दाखवायला पाहिजे, मग तो भांडवलदार असो, बागायतदार असो, सधन शेतकरी असो त्या वर्गाने ही तयारी दाखविली नाही आणि त्या वर्गाला तयारी दाखविण्याचे धैर्य हेही आपल्या विरोधी पक्षाने दाखविले नाही. सत्तारूढ पक्षाने दाखविले नाही जर आर्थिक आघाडीवर यश मिळवायचे असेल तर विरोधी पक्षाजवळ सुद्धा सुस्पष्ट असा आर्थिक कार्यक्रम असायला हवा.

जयप्रकाशांच्या आंदोलनासंबंधी सद्य:स्थितीत विश्लेषण करावेच लागणारआहे. जयप्रकाश ज्या वेळेला असे सांगतात की अमूक एका ठिकाणी भ्रष्टाचार आहे, लाचलुचपत आहे, पण त्यांच्याजवळ असा विशिष्ट विधायक आर्थिक कार्यक्रम काय आहे की जो योग्य आर्थिक आणि सामाजिक दास्यातून या देशाला मुक्त करू

शकेल ? या विषयी सुस्पष्ट असे दिग्दर्शन अद्यापतरी त्यांनी केले नाही. सध्याच्या परिस्थितीमध्ये जयप्रकाशजींनी जे आंदोलन सुरू केले आहे हे आंदोलन दिशाहीन वहात जाणाऱ्या प्रवाहा-सारखे वाटते. सत्तारुढ पक्षाला कदाचित जाग निर्माण करायला उपयोगी होईल. सत्तारुढ पक्षाला जबाबदारीविषयी जाणीव करून देणारा समर्थ असा विरोधी पक्ष या देशात निर्माण होऊ नये असे लोकशाहीवर प्रेम असणारा कोणीही नागरिक म्हणणार नाही. गेल्या २५ वर्षात ग्रेटब्रिटन किंवा अमेरिका या देशातल्या-प्रमाणे समर्थ संघटित व जबाबदार असा विरोधी पक्ष विरोधी नेत्यांना दुर्दैवाने निर्माण करता आला नाही. कसेही करून सत्ता-रूढ पक्षाला सत्ताभ्रष्ट करणे हे एवढे एकच ध्येय ठेवण्यामुळे विरोधी पक्षांना जरी सत्ता मिळाली तरी देशाचा पद्धतशीर विकास करता येणार नाही. याशिवाय आपल्या घटनेचे स्वरूप असे होते की केवळ काही राज्यामध्ये विरोधी पक्षाची सरकारे प्रस्थापित झाली तरी सबंध देशाचा एकसंघ असा आर्थिक विकास त्यांना करता येणार नाही.

या देशात कोणत्याही पक्षाचे का होईना परंतु ते सरकार भक्कम आणि संघटित असणे आवश्यक आहे. केंद्र सरकार संघटित असणे आवश्यक आहे. केंद्र सरकार दुर्बल झाल्यास देशाच्या आर्थिक विकासात तर फारच अडचण निर्माण होईल. परंतु या खेरीज गेल्या २५ वर्षांत लष्कराने दाखविलेला एकजिनसीपणा हा देखील नाहीसा होण्याचा धोका राहील. केंद्रसत्ता दुर्बल झाल्यास कांहीना आपल्याकडे लष्करी शासन येईल असे वाटते. ही लष्क-करशाही धोक्याची व हुकूमशाहीची ठरेल. हे तर खरेच आहे. परंतु शिवाय अशी लष्करशाही आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक परिवर्तन करू शकणार नाही. असा आजपर्यन्तचा इतर देशातील लष्करशाही राजवटीचा अनुभव आहे. आपल्या देशांत लष्कर–

शाही प्रस्थापित होईल असा धोका वाटत नाही, परंतु देशाच्या कांही भागांत संकुचित ध्येयाच्या आहारी गेलेले प्रादेशिकपक्ष बळकट झाल्यास आपल्या देशातून एखादा प्रांत फुटून मात्र निघण्याचा धोका राहील, आजच्या सध्याच्या महागाईने त्रस्त झालेल्या आणि आर्थिक विषमतेमुळे बेजार झालेल्या लोकांना प्रादेशिक पक्ष किंवा लष्करशाही नवीन आर्थिक क्रांती देऊ शकणार नाही, हा सगळा संभाव्य धोका डोळ्यापुढे ठेवून जयप्रकाशजींच्या आंदोलनाकडे आणि त्यातून निर्माण होणाऱ्या संभाव्य धोक्याकडे आपण बघायला हवे.

मी असे जेव्हा म्हणतो तेव्हां सत्तारूढ कॉंग्रेस पक्षाचे अपयश किंवा त्या पक्षाजवळ असलेली कांही वैगुण्ये डोळ्याआड करतो असे नव्हे. कांही स्वार्थी हेतूमुळे अनेक लोक आणि गट कॉंग्रेस पक्षाला येवून मिळत गेले· कॉंग्रेस पक्षामध्यें शिस्त बाळगणारे, कष्ट करणारे, उद्योगी व नवीन जीवनदृष्टी असणारे असा नवा अनुयायी वर्ग तयार झाला नाहीतर कॉंग्रेस पक्ष म्हणजे एक अनेक प्रकारच्या वृत्तींचा स्वार्थी लोकांचा कडबोळे होऊन बसेल. अशा आळशी आणि स्वार्थी अनुयायांकडून ·समाज प्रबोधनाचे कार्य निर्माण करणे नेत्यांना अशक्यच आहे. विरोधी पक्षाजवळ चांगला कार्यक्रम नसल्यामुळे व विरोधी पक्षही अनेक प्रकारचे छोटे छोटे निर्माण झाल्यामुळें प्रत्येक निवडणूकीत त्यातल्यात्यात कॉंग्रेस पक्षाला अधिक मते मिळाली. आणि या मुळेही प्रांतिक आणि जिल्हा पातळीवर कित्येक कॉंग्रेस नेते निवडणूकीतील यशाचे धुंदीने गाफील झाले. आणि म्हणूनच त्यातून ठिकठिकाणी लाचलुचपत, भ्रष्टाचार, काळा बाजार, चोरटी आयात इत्यादि आर्थिक गुन्हेगारी करणाऱ्या समाजकंटकांनी कॉंग्रेसमध्ये शिरून कॉंग्रेसचे नांव बदनाम केले. मध्यम

आणि गरीब वर्गांचे हाल वाढू लागले. दुर्दैवाने एक वर्षाआड आर्थिक दुष्काळ होत गेला. निर्यात पुरेशी झाली नाही. आयात मात्र वाढली. त्यामुळे परकीय चलनाचा तुटवडा निर्माण होऊन पायाभूत असे उद्योगधंदे नियोजनानुसार जे उभे रहावयास हवे होते ते उभे राहिले नाहीत. विकास कार्यावर अतोनात खर्च झाला. परंतू त्यात उधळपट्टी आणि अनुचित खर्च खूप झाला. सरकारला चलन पुरवठा वाढवीत न्यावा लागला. कृत्रीम पैशाचा प्रचंड वापर व्यवहात आल्यामुळे आणि त्या मानाने मालाची तरतूद बाजारात उपलब्ध नसल्यामुळे किमती भडकू लागल्या. त्यातच आर्थिक गुन्हेगारी करणाऱ्या विरुद्ध सरकारने कारवाई न केल्यामुळे जीवनोपयोगी पदार्थांची देखील टंचाई भासू लागली. अन्नधान्य कमी पडू लागले. घरांची टंचाई वाढली. शाळा कमी पडू लागल्या. औषधे मिळेनाशी झाली. या अशा सर्व गोष्टीमुळे सामान्य माणसाला प्रस्थापित सत्ते विरुद्ध तिटकारा वाटू लागल्यास नवल नाही. गुजरातमध्यें आणि बिहारमध्यें भ्रष्टाचाराविरुद्ध जो लढा सुरु केला त्यामागील कारणमिमांसाही समजण्यासारखीं आहे. जयप्रकाशजींच्या आंदोलनाला या अर्थाने महत्त्व प्राप्त झाले आहे. भ्रष्टाचाराने आणि बेशिस्तीने पोखरलेला सत्तारूढ पक्ष जाऊन त्या जागी जयप्रकाशजींची नवी समर्थ राजवट निर्माण होऊ शकेल अशी कित्येक लोकांना आशा वाटणे सद्यःस्थितीत स्वाभाविक होते.सत्तारूढ पक्षाने या परिस्थितीचा गंभीरपणे विचार करावयास हवा होता. जयप्रकाशजींच्या आंदोलनाची नैतिक भूमिका सद्यःस्थितीत कित्येकांना योग्य वाटत असली तरी त्यांचे हाती सत्ता आल्यास ते सध्याचे आर्थिक सामाजिक दुखणे दूर करू शकतील का ? हा खरा प्रश्न आहे. कारण त्यांच्या नांवाचा व कीर्तिचा फायदा घेवून अनेक छोटेमोठे दुर्बल विरोधीपक्ष एकत्र येवून हा लढा देत आहेत. विरोधी पक्षांचे असे हे कडबोळे सुसूत्र अशी राजवट निर्माण करू शकणार नाही. आणि अर्थिक परिवर्तनही करू शकणार नाही.

१९६७ साली अनेक राज्यामधून विरोधी पक्षांची संमिश्र मंत्री–मंडळे आली. परंतु अवघ्या २।३ वर्षातच गडगडली याचे कारण या संमिश्र मंत्रीमंडळासमोर लोकांना शिस्त लावणारा असा निश्चित कार्यक्रम नव्हता. त्यामध्ये ही अनेक आयाराम गयाराम होते.पुढारीवृत्ती होती. प्रादेशिक निष्ठेला वाहिलेले छोटे छोटे पक्ष होते. पंजाबमध्ये अकाली दल, तामिळनाडू मध्ये द्रविड मुन्नेत्र कळघम आणि महाराष्ट्रातील शिवसेना अशासारखे प्रादेशिक पक्ष सबंध राष्ट्राचा नवा आर्थिक कार्यक्रम उचलायला व पार पाडायला समर्थ नव्हते. उलट तामिळनाडूमध्ये देशातून फुटून निघण्याचीभाषा द्रमुक पक्षाचे नेते करित होते. आम्हाला औद्योगिक परवाने देण्याचे स्वतंत्र अधिकार असावे, आमचा स्वतंत्र ध्वज असावा आणि आम्हाला परकीय राष्ट्रांशी आयात निर्यातीचे स्वतंत्र करार करता यावे अशी पुढारी भाषा द्रमुक पक्षाची होती. या कारणामुळे पुन्हा एकदा जनता विरोधी पक्षाच्या संमिश्र मंत्रिमंडळाच्या प्रयोगाला विटली. आणि पुन्हा एकदा देशाच्या आर्थिक परिवर्तनाची जबाबदारी राष्ट्रीय पक्षांवर येवून पडली. या सर्व राष्ट्रीय पक्षांमध्ये तुलनात्मक दृष्टचा आज तरी सध्याच्या सत्तारूढ पक्षाजवळ आर्थिक परिवर्तन करण्याची थोडी फार तरी पुण्याई आहे. परवाच्या पाकिस्तानशी झालेल्या युद्धात आपल्या लष्कराने मोठा विजय मिळविला. हे एक आपले वैभव आहे. नविन बांगला देश निर्माण केला. ही एक जमेची बाजू आहे. बांगला देशातील एक कोटी निर्वासित आपण वर्षभर पोसले व ते नंतर व्यवस्थित सुखरूप परत पाठविले या गोष्टीचे आपल्या देशाच्या शत्रूस्थानी असणाऱ्या इतर अनेक देशांनी कौतुक केले आहे. रशियाला देखिल भारताशी २० वर्षाचा करार करावासा वाटतो. अमेरिकेला आपली लोकशाही टिकाविशी वाटते. हा देखील आपल्या देशाच्या शक्तीचा एक मोठा प्रत्यय आहे या सर्वाचे श्रेय इंदिरा गांधीना द्या किंवा नका देऊ परंतू एक मात्र

खरे की ह्या कठीण परिस्थितीत निर्धाराने कणखरपणे निर्णय घेणारे इंदिरा गांधींचे नेतृत्त्वच या वेळी आपल्याला उपयोगी पडले आहे. गेल्या काही दिवसात जीवनोपयोगी वस्तूंच्या टंचाईमुळे व महागाईमुळे इंदिरा गांधींच्या लोकप्रियतेला काही ओहोटी लागलेली आहे हे खरे आहे व म्हणूनच दूरगामी राष्ट्रीय हित लक्षात घेऊन तितक्याच कणखरपणे इंदिरा गांधींना अधिक कडक धोरण स्विकारावे लागणार आहे. हा कणखरपणा पंतप्रधानांनी बांगला मुक्तीच्यावेळी दाखवला. तोच कणखरपणा देशाची सध्याची विस्कटलेली आर्थिक घडी नीट बसविण्याच्या दृष्टीने दाखवावा लागणार आहे. आणि येथेच त्यांच्या नेतृत्त्वाची पुन्हा एकदा कसोटी लागणार आहे.

यादृष्टीने वेळ पडल्यास कॉंग्रेसचे पुन्हा एकदा शुद्धीकरण करावे लागेल. स्वार्थी, मतलबी लोकांना पक्षातून बाहेर काढण्याचे धैर्य दाखवावे लागेल. आर्थिक गुन्हेगारी करणाऱ्यांना कडक शासन करावे लागेल. पक्षातील सदस्यांना, अनुयायांना शिस्त लावावी लागेल. तालुका, जिल्हा या पातळ्यांवर निष्ठेने व प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या खऱ्या कार्यकर्त्यांना वाव द्यावा लागेल. शासकीय यंत्रणेत शिस्त निर्माण करावी लागेल. कोणा-चीही तमा न बाळगता क्वचित प्रसंगी प्रतिष्ठित लोकांनाही भ्रष्टाचार करीत असल्यास उजेडात आणावे लागेल. व्यसना-धीनता आणि आळस यांच्या आहारी गेलेल्या तरुण पिढीला उद्योगाची आणि शिस्तीची सवय निर्माण होईल असा नवा शिक्षणक्रम आणावा लागेल. भूमिहीन लोकांना ताबडतोब त्यांच्या ताब्यात जमीन मिळेल असे जे कायदे केले आहेत त्याची नीट अंमलबजावणी करावी लागेल. औद्योगिक क्षेत्रातही उत्पादन क्षमता व उत्पादन वाढेल असे नवे नियम आणावे लागतील. गेल्या काही वर्षात संघटीत कामगार वर्गाने जास्त वेतन आणि

महागाईभत्ता मिळविण्याच्या प्रश्नावरून अनेकवेळा संप केले. औद्योगिक अशांतता निर्माण केली आणि त्यामुळे उत्पन्न घटले. याबाबतीतही योग्य ती कारवाई करावी लागेल. या सर्व गोष्ठी लक्षांत घेता इंदिरा गांधीना किंवा सत्तेवर राहून जयप्रकाशजींना मरगळलेल्या, आळसावलेल्या तसेच व्यसनाधीन झालेल्या आणि लाचलुचपत करणाऱ्या गुन्हेगार वर्गाला वळण लावण्याचे सामाजिक आंदोलनाचे कार्य हाती घ्यावे लागेल. आजच्या परिस्थितीत खरी गरज सत्तांतराची आहे असे नसून जबाबदार व जाणत्या अशा सर्व पक्षांनी एकत्र येवून सामाजिक दुखणे नाहीसे करण्याचा एक सामुदायिक कार्यक्रम आखण्याचा आहे. आणि अशी आर्थिक सामाजिक दुखणी आजच्या परिस्थितीत पुष्कळच दिसत आहेत. कित्येक प्रश्न असे आहेत की ज्याबाबत विरोधी पक्षातील जाणत्या नेत्यांना सत्तारूढ पक्षाला सहकार्य करावेसे वाटेल.

उदाहरणार्थ वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न. ह्या मागासलेल्या देशातील लोकसंख्या सतत वाढतच असते. आज ६० कोटी लोकसंख्या असलेल्या या देशात पुढील ३० वर्षात आणखी ६० कोटीची भर पडणार आहे. गेल्या २५ वर्षांत आपण रशिया, युरोप, आस्ट्रेलिया या तीन देशातील मिळून असलेली लोकसंख्या नव्याने निर्माण केली. प्रतिवर्षी एक नवा आस्ट्रेलिया खंड आपण आपल्या देशात निर्माण करीत आहोत. या वाढत्या लोकसंख्येला उदरनिर्वाहासाठी लागणारी साधने आपल्याजवळ नाहीत. जमिनीवरील भार त्यामुळे वाढतच चाललेला आहे. औद्योगिक विकास हा बराच स्थगित असा झाला आहे. लहान उद्योगधंद्यांची वाढ नाही. बँकांची व रस्त्यांची पुरेशी वाढ नाही. अशा परिस्थितीत निर्यातही वाढत नाही. धान्याची आयात मात्र अमेरिकेकडून आपण गेली २० वर्षे सतत करीत आलो आहोत. त्यामुळे परकीय चलनावरील ताण वाढला आहे. यावर कुटुंब


नियोजनाचा संघटित प्रभावी कार्यक्रम हा एक उपाय आहे. आणि त्यासाठी विरोधी पक्षांनीही समाजप्रबोधनाचे कार्य हाती घ्यावयास पाहिजे. आपले कौशल्य (स्किल्स) वाढवून स्वतंत्र उद्योगधंदे करता येतील अशा तऱ्हेचे व्यवहारोपयोगी शिक्षण २५ वर्षात आपण दिले नाही. शैक्षणिक पुनर्रचना तर अजिबात झालेली नाही. केवळ पदवीधरांची संख्या वाढली आणि तीही काही मर्यादित ठिकाणीच. ७५ टक्के लोक अजूनही निरक्षर आहेत. त्यामुळे खेड्यातील अंधश्रद्ध जनतेची मूल्ये अजून जुनी आहेत. तांत्रिक आणि वैज्ञानिक जीवननिष्ठा आपण अजून निर्माण करू शकलो नाही. वैज्ञानिकक्रांतीच्या या नव्या युगात आपल्या अज्ञानात पडलेल्या बहुसंख्य जनतेला अंधारातून बाहेर आणावे लागणार आहे. त्याच्यात गरिबीची आणि दारिद्र्याची चीड निर्माण करावी लागणार आहे. स्वावलंबनाची आवड आणि निष्ठा निर्माण करावी लागणार आहे. कुटुंबनियोजनापासून ते थेट समाजप्रबोधनापर्यंतचा हा सर्व विधायक कार्यक्रम प्रत्यक्षात आणण्यासाठी सत्तारूढ पक्षाला आणि विरोधी पक्षांनाही कितीतरी करता येण्यासारखे आहे. आणि सध्याच्या मरगळलेल्या आणि न्यूनगंड निर्माण झालेल्या या परिस्थितीवर विधायक कार्यरचना हाच एक महत्त्वाचा उपाय आहे.

राजकीय आंदोलन आणि प्रादेशिक निष्ठा या गोष्टींना सद्य: स्थितीत तरी वाव नसावा. त्यामुळे अनेक वर्षे हलाखीत जीवन काढलेल्या सामान्य माणसाचीही दिशाभूल मात्र करण्यासारखे होणार आहे. जागतिक राजकारणातही आपल्याला प्रतिष्ठेचे स्थान मिळवायचे असेल तर प्रथम आपण आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावयास पाहिजे. सात वर्षे युध्दात खिचपत पडलेल्या व्हिएटनामने देखिल बाहेरच्या देशाकडून धान्यासाठी भीक मागितली नाही. चारही बाजूंनी अरब राष्ट्रांचा वेढा असून ही इस्रा-

यत्नने स्वाभिमान दाखविला आहे. याचे मुख्य रहस्य म्हणजे या देशातील लोकांना दारिद्र्याची जशी चीड आहे तसाच स्वावलंबनाचा अभिमान आहे. लढण्याची जिद्द आहे आणि त्यासाठी राष्ट्र म्हणून एक संघ राहाण्याचा निर्धार आहे. असा हा प्रखर निर्धार ही सद्यःस्थितीतील गरज आहे. आणि म्हणूनच या दृष्टिने इंदिरा गांधींना देखील वेळ पडल्यास सामाजिक व आर्थिक परिवर्तनासाठी पूर्वी घेतलेल्या प्रमाणे धक्का देणारे आणखी काही निर्णय यापुढे कदाचित घ्यावे लागणार आहेत. दूरगामी राष्ट्रीय हित डोळ्यापुढे ठेवणाऱ्या आजच्या पंतप्रधानांना ही गोष्ट करणे कठीण नाही. ज्या पंतप्रधानांनी बांगला मुक्त करून नेत्रदीपक विजय मिळविला त्यांना देशातील हे अंतर्गत शुद्धीकरण का करता येऊ नये हा एवढा प्रश्न साहाजिकच सध्याची त्रस्त अशी जनता विचारत आहे.

सद्यःस्थितीचे हे विश्लेषण प्रत्येक नागरिक सर्वसाधारणपणे याच दृष्टिने जवळ जवळ करत आहे. स्पेन, इटलीसारखी राष्ट्रे आळसामुळे व व्यसनाधिनतेमुळे मागे पडली. त्याचबरोबर जपान, जर्मनीसारखी राष्ट्रे केवळ शिस्तीमुळे, उद्योगामुळे पुन्हा २५ वर्षात समर्थ बनली. त्याचे रहस्य शोधून काढणे मोठे कठीण नाही. व त्यावरची उपाययोजना हीही सर्वांना माहीत आहे. आज म्हणून आपल्या राष्ट्राला जी गरज आहे ती जाणत्या व जबाबदार अशा अनुयायीवर्गाची, निर्धारपूर्वक काम करणाऱ्या अशा यंत्रणेची, कष्ट करणाऱ्या कामगारांची आणि शेतकऱ्यांची, नवे तांत्रिक, वैज्ञानिक प्रयोग करणाऱ्या शास्त्रज्ञांची. कल्पकतेने नवी बाजारपेठ मिळविणाऱ्या आणि नवे उत्पादन करणाऱ्या उद्योजकांची. सद्यःस्थितीवरील उपाययोजना ही अशी आहे. व म्हणूनच सामान्य माणसाला राजकीय क्रांती, राजकीय अशांतता संप आणि सत्याग्रह हे म्हणजे खरे आता नको आहेत. कारण

त्यामुळे कमकुवत (weak) होत गेलेला आर्थिक प्रश्न सुटणार नाही. हे आव्हान पत्करणे आणि सद्य:स्थितीतून मार्ग काढणे हे तरुण पिढीच्या हाती आहे. ही तरुण पिढी कोणत्या संस्काराने आणि विचाराने प्रभावित होते या वरच देशाचे भवितव्य अवलंबून आहे. आणि म्हणूनच जाणत्या नेत्याबरोबरच सामान्य माणसानेही सद्य:स्थितीची राजकीय भूमिका बाजूला ठेवून वस्तुनिष्ठपणे व डोळसपणे विचार करायला हवा. येथील व्यख्यानमालेच्या संयोजकांनी या दृष्टिने या विषयावर बोलण्याची मला संधी दिली हे मी माझे भाग्य समजतो कारण त्यामुळे निरनिराळया ठिकाणी अशातऱ्हेच्या चाललेल्या वैचारीक मंथनातून नवे काहीतरी शिकण्याची संधी माझ्या सारख्याला मिळते. व म्हणूनच संयोजकांचे कृतज्ञापुर्वक आभार मानून मी माझे हे भाषण संपवितो.



या व्याख्यानमालेतील यापूर्वीचे व्याख्याते नि विषयः–

| व्याख्याते | विषय |
| --- | --- |
| **वर्ष : पहिले १९७३ :** | |
| श्री. देवदत्त दाभोळकर<br>प्राचार्य,<br>फर्ग्युसन कॉलेज पुणे. | **राजकारण आणि समाजजीवन** |
| आमदार<br>मा. पं. मंगुडकर<br>पुणे. | **भारतीय समाजवाद कांही विचार.** |
| प्रा. गं. बा. सरदार<br>पुणे. | **भारतीय समाजवाद आणि ऐहिक निष्ठा** |
| **वर्ष : दुसरे १९७४ :** | |
| प्रा. ए. एम्. खान<br>श्री शाहू मंदीर महाविद्यालय<br>पुणे. | **भारतीय लोकशाही : कांही विचार** |
| श्री. वि. अ. नाईक<br>न्यायमूर्ती, पुणे. | **लोकशाही समादवाद** |
| श्री. सदाशिव बागाईतकर<br>पुणे. | **अविकसित देशातील समाजवादाचे स्वरुप** |

-----

– आणि यंदाच्या (१९७६) व्याख्यानमालेत

| व्याख्याते | विषय |
|---|---|
| **श्री. गोपाळराव मयेकर**<br>माजी शिक्षण मंत्री, गोवा<br>व प्राचार्य,<br>देवगड कॉलेज, देवगड. | **भारतीय समाजाच्या परिवर्तनाची दिशा आणि वेग** |
| प्रसिद्ध चरित्रकार<br>**पद्मभूषण धनंजय कीर,**<br>मुंबई. | **राजर्षी शाहू छत्रपती आणि नवभारताची मागणी** |